# शेतावरल्या प्राण्यांची गोष्ट

प्रकाश कार्येकर



**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# शेतावरल्या प्राण्यांची गोष्ट

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**मग**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# शेतावरल्या प्राण्यांची गोष्ट

(कथासंग्रह)

लेखक

## प्रकाश कार्येकर

# शेतावरल्या प्राण्यांची गोष्ट (कथासंग्रह)

लेखक: प्रकाश कार्येकर

प्रकाश भालचंद्र कार्येकर

९०१ / ५, एकोलेड सोसायटी , लुईस वाडी, ठाणे ४००६०४

फोन - ९८१९८४७५६८

ईमेल: p_karyekar@yahoo.co.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.in

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : १६ नोव्हेंबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

जन्मदात्री आणि जगद्धात्री

ज्यांनी मला घडवले,

त्यांना

सादर अर्पण

# ओळख



मी एक मध्यम वर्गीय, सामान्य माणूस आहे. मी अज्ञ आहे, तज्ञ नाही. सगळ्या विषयात रस-रुची-आवड-निवड-जाणीव असणारा, संवेदनशील सामान्य माणूस. सामान्य माणसाची दिवसाची सुरुवात वर्तमान पत्राने होते. माझी सुद्धा सकाळ चहा आणि वर्तमान पत्रानेच होत होती.

नंतर दूरदर्शनमुळे बातम्या जास्त रंगीत, आकर्षक झाल्या. तेव्हढ्याच त्या सवंग, बाजारू झाल्या. सत्तेच्या आधीन झाल्या. सत्तेचे आणि स्वतःचे हित जपणाऱ्या झाल्या.

तेंव्हा नुकतेच संगणक युगाची, इंटरनेटची, सुरुवात झाली होती. त्यावर बातम्या बघण्याचा, माहिती शोधण्याचा, एक विरंगुळा मिळाला. जसजसे प्रत्येक बातमीचा स्त्रोत, त्यावर चारी बाजूने मिळणारी माहिती आणि विश्लेषण - ह्यांचा ओघ वाढला, तसतसे भारतीय प्रसार माध्यमाची विश्वसनीयता कमी होत गेली. शून्यवत झाली. सामाजिक माध्यमाची गरज जाणवू लागली. आता रोजचे सकाळचे वर्तमान पत्र चिडवणारे, चीड आणणारे, खोटे, अपूर्ण, एकांगी आणि दुष्ट वाटू लागले.

आणखी एक स्पष्टपणे कळले, हिंदू जन मानसाची मोठ्या प्रमाणावर घुसमट होत आहे. जाणीवपूर्वक केली जात आहे. प्रसार माध्यमे, सत्ताधीश आणि त्यांचे बुद्धिवादी हस्तक, त्यांनी पेरलेले आणि वेचलेले साहित्यिक, त्यांनीच नेमलेले अधिकारी - सगळे मिळून हिंदू माणसाला आणि त्याच्या प्रिय संस्कृतीला घेरून, मिळेल त्या विषयावर बदनाम करता आहेत. हिंदू माणसाला बोलता येत नाही, सहन होत नाही, विरोध करणे दूरच राहिले. अशी परिस्थिती निर्माण केली गेली. अशा वेळी सत्याचा आधार मिळाला तो सामाजिक माध्यमातून.

आपल्या स्वातंत्र्यावर हा उघड हल्ला आहे आणि लोकांना त्याची पुसटशी सुद्धा जाणीव नाही, ह्यामुळे जास्त वाईट वाटले.

मनाचा हा एकलकोंडा, अगतिक प्रवास गेल्या दोन दशकांचा आहे. तो उथळ आणि तात्पुरता नाही. भारतीय स्वातंत्र्य आणि लोकशाही ह्यांचा चौथा आधारस्तंभ मानला गेलेला प्रसार माध्यम व्यवसाय फक्त स्वार्थ आणि फायद्यासाठी काम करतो, त्यासाठी देशाच्या हिताचा बळी देतो, ही वेदना खोल आणि तीव्र आहे.

त्या मनाच्या स्थितीत 'पहाटेपूर्वीचा काळोख - एक अरण्य रुदन' आणि 'जोकोतीना - स्वातंत्र्य समर तिसरे' लिहिले गेले. लिहिल्यामुळे मनात कोंडलेल्या विचारांना वाट मिळाली. आणि मग असच काही

बाही लिहित राहिलो. जोकोतीना म्हणजे भविष्यात घडाव्या अशा अनेकविध घटनांची - दिवास्वप्नाची, सूचक नांदी होती.

मी इतिहास लेखक किंवा इतिहासाचा अभ्यासक नाही. विचारवंत / तत्वज्ञ मुळीच नाही. साहित्यिक नाही. साहित्याचा अभ्यासक नाही. मी खूप काही वाचले आहे, असा माझा दावा नाही. मला कळते, समजते असा माझा अभिनिवेश नाही.

सामान्य, सुशिक्षित, सुजाण माणसाला जे दुखते, खुपते, पटते, ओढ लावते, अस्वस्थ करते, किंवा ज्याची टिंगल करावी असे वाटते, ते ते मी निस्वार्थ, निरागसतेने, हक्काने केले आहे. वाचकांनी ते मानून घ्यावे, समजून घ्यावे ही एकच विनंती.

बहुतेक कथा ह्या काल्पनिक चित्रावली (Fantasy) प्रकारात मोडतात. त्यात भारतीय अध्यात्मिक विचार गृहीत आहेत. तसेच आजचे आघाडीचे विज्ञान सुद्धा गृहीत आहे. रामानुजन सारखा महान गणिती असे म्हणतो "An equation for me has no meaning unless it represents a thought of God." तशी गणित आणि श्रद्धा हि सुद्धा ह्या कथांची पार्श्वभूमी आहे.

खरे तर हे सगळे स्वान्तः सुखाय असेच होते. पण मग वाटले ALL THAT IS NOT SHARED IS LOST. ह्या भीतीतून हा लिहून ठेवण्याचा आणि प्रकाशनाचा प्रपंच घडला.

प्रकाश कार्येकर (०७-०७-२०१८)

## मनोगत

मी एक सामान्य भारतीय माणूस आहे. माझे बालपण रामायण आणि महाभारतातल्या - राम आणि कृष्ण – ह्यांच्या कथा ऐकण्यात गेले. अज्ञ ते तज्ञ, लहान आणि मोठे, सगळे भारतीय ह्या ऐतिहासिक गोष्टींमध्ये रमतात. गीतेवर, इतकेच काय गीतेवरील टीका ग्रंथ ज्ञानेश्वरी वर सुद्धा अभ्यास करण्यात इथले विद्वान पंडित आयुष्य घालवतात.

मग भारतातल्या एका पूर्ण पिढीने अहिंसेचा अतिरेक कसा सहन केला हे कळत नाही. राम आणि कृष्ण ह्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. आणि पश्चात विलाप केला नाही. अध्यात्माचे जिवंत आणि जाज्वल्य आदर्श समोर असताना आम्ही त्यांना सोडून भोंगळ आणि भिकारी विचारांना का आणि कसे कवटाळले हे कळत नाही.

आम्ही संताना आणि त्यांच्या जीवनातल्या अनुभवांना सुद्धा इतके कसे विसरलो की अध्यात्माचा विकृत अर्थ लावला. विकृत प्रयोग प्रामाणिकपणे जगजाहीर केले म्हणजे ते सत्याचे प्रयोग कसे होतात. आणि जेंव्हा त्यांचा निष्कर्ष एखाद्या निष्पाप व निरपराधी

माणसाच्या आत्महत्येत होतो तेव्हा त्यांना अध्यात्मिक कसे म्हणता येईल, हे कळत नाही.

अध्यात्म ही शांतातावाद्यांची मक्तेदारी नाही. तर पुरुषार्थाने करायची वाटचाल आहे असे संत सांगतात तर जीवनातून – संघर्षापासून निवृत्ती हे एक तत्वज्ञान कसे होऊ शकते.

हा गोंधळ संपत नाही तोवर भारतीयाने जगायचे कसे हे कळत नाही.

प्रकाश कार्येकर

कथानुक्रम

१. खाटीक आणि महात्मा

२. न्याय

३. शेतावरल्या प्राण्यांची गोष्ट

४. पंचा, मफलर आणि सूट

५. शेकोटीपाशी उगाच काहीतरी

या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक आहेत. त्यांतील व्यक्ती, स्थळ, प्रसंग हे सर्व काल्पनिक असून वास्तवातील कोणा व्यक्ती वा स्थळाशी त्यांचे साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग ठरेल.

# खाटिक आणि महात्मा

*(अध्यात्म ही अहिंसावादी किंवा शांततावादी ह्यांची मक्तेदारी नाही.)*

---

एका मोहमयी, मायानगरीत एक महात्मा राहत होते. त्यांचा उपदेश ऐकायला लोक खूप लांबून लांबून येत आणि प्रेरित होऊन, स्फूर्ती घेऊन जात. त्यांच्या आश्रमात सकाळ, संध्याकाळ नित्य नेमाने प्रार्थना होत असे. प्रार्थने नंतर महात्म्याचे प्रवचन असे. प्रवचनात सत्य आणि अहिंसा यावर त्यांचा नेहमी भर असे. शांती हे त्यांचे ध्येय होते.

त्यांची ती रोजची (प्रार्थना) भुणभुण ऐकून देवाने एकदाचे त्यांचे म्हणणे मान्य केले.

आकाशवाणी करण्यात आली.

'बाबू खाटिक ला भेटा. तो तुम्हाला सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखवेल. '

महात्मा गोंधळले. त्यांचा विश्वास बसला नाही. पण दुसऱ्या दिवशी ही तीच आकाशवाणी झाली. त्यांना वाटले नावात किंवा

आपल्या ऐकण्यात चूक झाली असावी. पण नाही. तिसऱ्या दिवशी ही तीच आकाशवाणी झाली. आता त्यांना कुतूहल निर्माण झाले. कोण हा बाबू खाटिक? चौकशी केली.

बाबू खाटिक खरेच होता, महानगरीच्या एका टोकाला त्या गलिच्छ आणि बकाल वस्तीत बाबू खाटिक चे मटणाचे दुकान होते. महात्मा बाबू खाटिक ला भेटायला गेले.

दुकान फार मोठे नव्हते. दुकानात तीन चार सांगाडे, सोललेले, रक्ताने माखलेले, टांगले होते. एका मेजावर मांसाचा ढीग होता. एक काळा कभिन्न, उंच, धिप्पाड माणूस, बाजूला लाकडाच्या ओंडक्यावर मांसाचे बारीक तुकडे करण्यात मग्न होता. शेजारी धारदार, लांब सुरा पडला होता. उग्र चेहरा, कल्लेदार मिशा, भारदस्त, जरब वाटणारे व्यक्तिमत्व. सुरी आणि जीभ एकाच वेळेला, सराईतपणे आणि जलदीने चालत होती. मांसाचे तुकडे करता करता त्याच वेळेला तो समोरच्या दोन गिर्हाइकाशी मटणाच्या किमती बद्दल व्यवहार ही करत होता. महात्मा दुकानात शिरताच बाबू थांबला, त्याने वाकून, महात्म्यांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. मग भिंतीला पाठ लावून हात जोडून अदबीने विचारले,''महात्मन, काय सेवा करू आपली? मला बोलावले असते, मी जातीने हजर झालो असतो. आपल्या साठी

आकाशवाणी करण्यात आली, एकदा नाही, तीन वेळा. आपण धन्य आहात. माझी झोपडी आपल्या आगमनाने पावन, पवित्र झाली.”

महात्मा दचकले, बाबुला कसे कळले आकाशवाणी बद्दल.

“महात्मन, तोच एकटा करता आणि करविता आहे. मार्गदर्शक ही तोच, मार्ग तोच आणि मार्गस्थ ही तोच. मी फक्त निमित्त मात्र.”

महात्मा अगदी अस्वस्थ झाले, नोकरचाकर आणि स्वयंसेवक, अनुयायी, कार्यकर्ते, कोणीही बरोबर नव्हते हे बरेच झाले, थोडे हायसे वाटले. हा मटणाचा व्यापारी सत्य, अहिंसा आणि शांतीचा मार्ग दाखवणार?

“तुम्ही, बाबू खाटिक? तुम्ही ह्या व्यवसायात कसे आणि का आलात, आणि किती काळ ह्यात घालवला ; हा व्यवसाय सोडून अहिंसा आणि शांतीचा मार्ग का धरत नाही?”

“हा माझा पिढीजाद व्यवसाय आहे, माझे पणजोबा उत्तम शिकारी होते आणि त्यांनी हा व्यवसाय सुरु केला. शिकार हा आमचा पिढीजाद छंद आहे.”

“पोटासाठी, स्वार्थासाठी, दुर्बल प्राण्यांना ठार मारणे हे योग्य आहे?”

“शिकार म्हणजे खून नव्हे. मृगया हा एक साहसी खेळ आहे. मारणारा आणि मरणारा दोघेही जीवावर उदार होऊन खेळतात. मृत्यूचे पारडे कोणाच्याही बाजूने कधीही झुकू शकते. जीवाच्या आकांताने धडपड, दोघांना ही करावी लागते, तेंव्हा शिकार सिद्ध होते. हरीण काय कि रान डुक्कर काय, वाघ काय कि अस्वल काय, सहजच, प्रतिकार न करता खाली पडत नाहीत. शिकार करणाऱ्याला केव्हढी मेहनत, चिकाटी आणि कौशल्य दाखवावे लागते. केवढ्या शक्तीचा, युक्तीचा उपयोग करावा लागतो. मृगया हा पुरुषार्थ आहे, तो शिकाऱ्याच्या मनोभूमिकेत आहे. पाळीव प्राण्यांना ठार मारणे म्हणजे शिकार नव्हे. तो माझा व्यवसाय ही नाही. पण माझ्या चरितार्थासाठी मी शिकार करतो, मांस विकतो, मृगाजिन विकतो, ते माझे जन्मजात विहित कर्म आहे. प्रत्येक हिंसा सरधोपटपणे त्याज्य नसते. हिंसा कृती म्हणून, संघर्षाचा, जीवनाचा आवश्यक भाग आहे. पण हिंसा हा विचार म्हणून सर्वथैव त्याज्य च आहे. सर्व प्राणीमात्रांचे कल्याण करणे आणि अकल्याण होताना रोखणे हे महत्वाचे. आणि ते विहित कर्माच्या, कर्तव्याच्या माध्यमातून करणे हे अध्यात्म. तेंव्हा, कृती च्या पाठी मागील विचार महत्वाचा आहे. विचारामुळे कृती त्याज्य किंवा ग्राह्य ठरते.

सुरी आणि सुरी पकडणारा हात तोच आहे, पण तो हात जर शल्य विशारादाचा असेल तर त्यचा अर्थ वेगळा आणि तो हात जर दरोडेखोराचा असेल तर त्याचा अर्थ वेगळाच असणार, नाही का महात्मन!!!"

महात्मा परत एकदा गोंधळले, विचार करत गप्प बसले.

"महात्मन, माझ्याकडून ही एक छोटीसी भेट स्वीकार करावी."

"काय आहे हे?"

"हे एक मृगाजिन आहे. मायावी मृगाची शिकार करणारा ह्या मृगजीनाचा अधिकारी आहे. तो प्रभूच आपल्या सर्वांना मार्ग दाखवेल अशी त्याच्या चरणी प्रार्थना करू या."

बाबू आपल्या कामाला लागला आणि महात्मा परत फिरले.

काही तरी, कोणाची तरी खूप मोठी चूक होते आहे असे त्यांना वाटले. एव्हढी बटबटीत, धडधडीत हिंसा. स्वार्थासाठी. पोटासाठी. पण बाबू तर मनाने निर्मळ, पारदर्शी, सरळ आणि साधा वाटतो. त्याच्या मनात जराही शंका नाही, जराही पश्चात्ताप नाही, पापाचा लवलेशही नाही. काही तरी चुकते आहे.

*********

महात्मा विचार कर करून थकले, पण बाबू खाटिक चे कोडे सुटले नाही. प्रार्थने नंतरची प्रवचनाची प्रथा काही दिवस त्याने स्थगित केली. कसली हिंसा, कोणाची हिंसा, कोण करणार, का करायची किंवा का करायची नाही, हिंसा म्हणजे तरी नक्की काय.

तेंव्हा बाबु खाटिक ला परत भेटण्यासाठी, महात्मा शहराच्या त्या आड मार्गावरून निघाले.

आपल्याच तंद्रीत चालत असताना, एकदम आरडा-ओरडा आणि रडण्याच्या मोठ्या आवाजाने त्यांचे लक्ष वेधले. एक दारुडा आपल्या बायकोला मारहाण करत होता, तिच्याकडे पैशाची, तिच्या स्त्री धनाची, मागणी करत होता, ती देत नाही म्हटल्यावर पुन्हा पुन्हा मारत होता. लोक जमा झाले होते. तिला त्याच्या पासून सोडवत होते.

विषण्ण मनाने ते पुढे निघाले. नवरा बायकोच्या भांडणात पडणे शिष्ट सम्मत नाही.

थोडे पुढे गेले तर वाटेत एका ठिकाणी एव्हढी गर्दी जमली होती कि पुढे जाणे अवघड झाले.

चार पाच गुंड एका म्हाताऱ्याला आणि त्याच्या नातीला दमदाटी करत होते. म्हाताऱ्याला मारहाण करत होते आणि मुलीला जबरदस्तीने ओढून नेत होते. ती आजोबाना आणि सभोवतालच्या

माणसाना मदतीसाठी हाक मारत होती. कोणीही पुढे जाऊन त्या गुंडांना अडवण्याचे धाडस दाखवत नव्हते. महात्म्याने पुढे होऊन त्या गुंडांना कारण विचारले. म्हाताऱ्याच्या मुलाने त्या गुंडा कडून काही पैसे पूर्वी उसनवार घेतले होते, ते त्याने परत फेडले नव्हते आणि त्याच मोबदला म्हणून ते गुंड त्याच्या मुलीला उचलून घेऊन जात होते. म्हातारा सांगत होता कि तो जसे जमतील तसे पैसे फेडेल, पण गुंड मुलीला घ्यायलाच आले होते. महात्म्याची लुडबुड त्यांनी खपवून घेतली नाही, एका गुंडाने तर त्यांना एक सणसणीत थोबाडीत मारली आणि तेथून निघून जायला सांगितले. महात्मा अगदी कसनुसे, कावरे बावरे झाले आणि तिथून नकळत सटकले.

जशी गर्दी वाढू लागली, तसे गुंडांचा म्होरक्या चिडला. त्यांनी म्हाताऱ्याला बेदम मारहाण करून अर्ध मेला अवस्थेत टाकून दिले, जबरदस्तीने म्हाताऱ्याला नातीपासून वेगळे केले, आणि मुलीला फरपटत ओढून नेले. सगळे बघत राहिले. महात्मा मटकन खाली बसले. हिंसेचा हा अनुभव विदारक, छिन्न-भिन्न, विकीर्ण करणारा होता. हिंसेचा प्रतिकार अहिंसेने करायचा ही त्यांची शिकवण होती. पण म्हणजे कसा? अपमानित, खाली मान घालून ते तेथून निघाले. त्यांना कोणी ओळखले नाही, हे त्यातल्या त्यात बरे झाले.

************

विमनस्क महात्मा बाबू खाटिक कडे पोहोचले, तेंव्हा बाबू सुऱ्याला धार लावत होता. त्यांना बघून बाबूने वाकून, पायाला हात लावून नमस्कार केला. त्यांना आसन दिले, पेय दिले.

"ही वस्ती अशीच आहे. इथे गुंड जास्त आणि नागरिक कमी. अशा हिंसक घटना रोजच घडतात. हिंसेचे हे ओंगळ, दाहक आणि दहशतवादी रूप पाहून आपण विचलित झालात. पण मायेच्या राज्यात असे व्हायचेच. इथे अन्याय, अशांती आणि असंतोष कायमचा. तरीही सामान्यपणे ह्या गोष्टीच, माणसाना वैराग्याकडे, आध्यात्मिक मार्गावर ढकलतात."

महात्मा दचकले, ह्याला सगळे आधीच, न सांगता कसे कळले, ह्याचे हेर सगळीकडे फिरत असावेत.

"महात्मन, ह्या वस्ती तर्फे आपल्याला ही छोटीसी भेट. आपल्या उपयोगाची आहे."

तो एक सागवानी दंड होता, चांदीने मढवलेला, भरीव, सशक्त, उंच, जणू काही राजदंड.

"पण मला ह्याची काय जरूर?"

“महात्मन, प्रत्येक लोक नेत्याला ह्याची जरूर असते. सत्य, अहिंसा, शांती अशा शब्दांच्या कलेवराला जिवंतपणा मिळतो ह्या दंडामुळे.”

“पण मला तर सत्तेची आजीबात हाव नाही. सत्ता त्याज्ज्य आहे माझ्यासाठी.”

“महात्मन, तुमच्या कडून इतक्या सामान्य, छोट्याशा, गोष्टीची अपेक्षा नव्हती. सत्ता जनहितार्थ अबाधितपणे, अखंडपणे, सशक्तपणे, राबवण्यात, खरा पुरुषार्थ आहे. सत्तेपासून पळून जाण्यात नाही. 'राजा कालस्य कारणं' अर्थात राजा समाजस्थितीचा कारक आहे.”

महात्मा दंड घेऊन परत आले. पण आश्रमाची असंबद्धता त्यांना जाणवली.

***********

एक दिवस अचानक नगरात निराधार, असहाय लोकांचे लोंढे च्या लोंढे येऊ लागले. त्यांच्यावरील अत्याचाराच्या, दुर्दैवी कहाण्या ऐकून नगरवासी घाबरले. लोक महात्म्याकडे गेले. महात्म्याने त्यांना संयम, शांती आणि अहिंसेचा सल्ला दिला.

“एकाने डोळा फोडला म्हणून दुसऱ्याने ही डोळा फोडला, तर सगळेच आंधळे होतील.”

लोकांचा धीर सुटत चालला. ते बाबू खाटिक कडे गेले. बाबू ने नगरातील सगळ्या खाटीक ना बोलावले.

“आज आपल्यावर जबाबदारी येऊन पडली आहे. आक्रमकांचा संघटितपणे मुकाबला करायचा. आक्रमक संख्येने आपल्या दसपट आहेत. क्रूर श्वापदासारखे आहेत. पण आपण ही शूर शिकारी आहोत. एकही आक्रमक आपल्या हातून सुटता कामा नये. आणि एकाच्या बदल्यात दहा असा हिशोब करायचा. आक्रमकाशिवाय दुसऱ्याला मात्र हात लावायचा नाही.”

सतत १५ दिवस गल्ली बोळातून, अंधारातून, आडून, धुमश्चक्री होत होती. मोजक्या शंभर सव्वाशे खाटिक सेनेने २००० - ३००० आक्रमकांना लोळवले. दारूण पराभव समोर दिसू लागताच आक्रमक महात्म्याकडे गेले. त्यांनी बाबू खाटिक विरुद्ध मनुष्य वधाची तक्रार केली. महात्म्याने सर्वांना शस्त्रे खाली ठेवण्याची सूचना केली. पण बाबू खाटिक ने नकार दिला. त्याने उलटा निरोप पाठवला.

“जो पर्यंत शेवटचा आक्रमक उभा आहे, तो पर्यंत हा बाबू खाटीक, सुरा खाली ठेवणार नाही.”

परत एकदा महात्मा गोंधळले. बाबू खाटिक ला समजवण्यासाठी ते त्याच्या दुकानात आले. लोक जमा झाले. ते

'बाबू खाटिक विजयी होवो', 'महात्मा, परत जा' अशा घोषणा देत होते.

“बाबू, हिंसेने प्रश्न सुटत नाहीत. अहिंसा आणि शांती चा मार्ग धरा. शस्त्रे खाली ठेवा. आपल्या नगरात आलेले हे लोक आक्रमक नाहीत तर आपले पाहुणे आहेत. आतिथ्य आणि परस्पराप्रती सन्मान हा आपला धर्म आहे.”

“महात्मन, सत्य, शांती, अहिंसा ही अध्यात्मिक मुल्ये आहेत. अध्यात्म हा पुरुषार्थ आहे. अन्यायापासून स्वतःला वाचवणारी, दूर नेणारी पळवाट नाही.

अध्यात्म हा माणूस आणि देव ह्यांच्यातील नातेसम्बधाचा, शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, आत्मिक अशा विविध पातळयांवरील नातेसम्बद्धाचा हा अभ्यास विषय आहे. हा प्रवचनाचा विषय नाही. वैयक्तिक आचरणाचा भाग आहे.

हा सामाजिक ध्येय धोरणाचा ही भाग नाही. ही मुल्ये म्हणजे सार्वजनिक, सार्वकालिक, कर्मठ नियमांचे जंजाळ नाही. ह्या मुल्यांची एक सर्वंकष व्याख्या नाही.

समाजाचे अकल्याण होण्यापासून रोखणे हा आज, आता, अध्यात्माचा सारांश आहे, तो माझा धर्म आहे आणि तो मी

निभावणार आहे. जो पर्यंत शेवटचा आक्रमक उभा आहे, तो पर्यंत हा बाबू खाटीक, सुरा खाली ठेवणार नाही.”

बाबू खाटिक च्या उत्तरावर महात्मा जास्त काही बोलले नाहीत, विचार करत बसले. एका घटकाभराने ते उठले आणि चालू लागले. महात्मा परत गेले. पण ते आश्रमात नाही पोहोचले. त्यांना खूप शोधले. पण त्या नंतर ते कोणालाच दिसलेच नाहीत. ते कोठे गेले कोणालाही ठाऊक नाही.

# न्यायाधीश विरुद्ध देव

*(न्याय यंत्रणा सडलेली आहे, पोखरलेली आहे, त्याचा फटका देवाला सुद्धा बसतो आहे. संविधान आणि पूजेचा हक्क हे तर निमित्त आहे, खरे तर समाजाला तोडण्याचे हे कारस्थान आहे.)*

---

आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आलेला खटला जरा वेगळाच होता. न्यायमूर्ती श्री. रविचरण दासगुप्ता ह्यांनी परत एकदा खटल्याच्या कागदपत्रांकडे नजर टाकली. आपल्या आलिशान वातानुकुलीत कक्षात बसून ते विचार करत होते. कोणालाही आत सोडू नये, अशी सक्त ताकीद त्यांनी आपल्या स्वीय सचिवाला देऊन ठेवली होती. पण त्यांच्या विचारात सुसूत्रता येत नव्हती, एकाग्रता होत नव्हती. आणि त्याचे एक कारण हे होते कि खटला सर्वोच्च न्यायालयाच्याच विरोधात होता. कोणी विष्णू सोम नावाच्या माणसाने तो दाखल केला होता. त्याला आता ९१८ वर्षे झाली होती. सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित खटले हा एक वादाचा, विनोदाचा आणि शेवटी एका अगतिक, निराश आणि हताश अशा अमानुष व्यवस्थेचा विषय बनला होता. सर्व वर्तमान पत्रात आणि विश्वात दूर दर्शन वर त्या खटल्याची चर्चा आणि टीका

होत होती. हजार वर्षात ही, एक गोष्ट मात्र बदलली नव्हती ती म्हणजे परधार्जिण वर्तमान पत्रे आणि दूरदर्शन वाहिन्या, आणि हो, भारतीय माणसाची चर्चा करण्याची आवड.

त्यांना खात्री होती कि हा विष्णू सोम कधीच मेला असणार, त्याचे वारस सुद्द्धा जिवंत नसणार. खटला दाखल झाल्या नंतरचे ते स्वतः सुद्धा २२१ वे न्यायाधीश होते. संविधानातील स्वातंत्र्या संबंधी हा एक जटील खटला होता.

'कोणताही भेद भाव न करता, मंदिरात जाऊन देवा ची पूजा - अर्चा करण्याचे प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. आणि प्रत्येकाचा तो हक्क आहे. '

संविधानाच्या ह्या कलमाचा अन्वयार्थ लावण्याची जबाबदारी आता न्यायाधीश दासगुप्ता ह्यांच्यावर येऊन पडली होती.

त्यांना अजूनही खटल्याच्या बहुविध बाबींकडे एकाग्रचित्त करून बघता येत नव्हते. ह्याचे दुसरे महत्वाचे कारण होते त्यांचे वातानुकुलीत यंत्र थोडेसे बिघडले होते. त्यांनी बाहेर उभ्या असलेल्या शिपायाला हाक मारली, कार्यालयातील तंत्रज्ञाला बोलावून तपमान २१ डिग्री वर कायम करायला सांगितले. ह्या

बाबतीत थोडीही असुविधा, त्यांना सहन होत नसे, त्यांचे चित्त विचलित करण्यास पुरेशी होती.

ह्या विष्णू सोमाचे मुख्य म्हणणे होते, ज्याची पूजा - अर्चा करायची त्या देवाच्या स्वातंत्र्याचे काय, त्याला विचारायला नको का कि त्याला ही अनिर्बंध लुडबुड, अनावश्यक हस्तक्षेप आणि अनोळखी अगन्तुकांची मनमानी हवी आहे का.

पण खटल्यामध्ये तांत्रिक त्रुटी खूप होत्या.

विष्णू सोम ह्याने त्याचे पूर्ण ओळखपत्र किंवा परीचयपत्र दिले नव्हते. त्याने देवाच्या सहीचा वकालतनामा सादर केला नव्हता.

न्यायाधीश दासागुप्ताना एक क्षण वाटले कि आधीच्या सर्वोच्च न्यायपीठाने असे देवाला, जी एक मुख्य व्यक्ती आहे खटल्यामध्ये, असे गृहीत कसे धरले. एकाला स्वातंत्र्य देताना दुसऱ्याचे स्वातंत्र्यचा विचार कसा केला नाही.

तेव्हड्यात त्यांचा गुप्त वैयक्तिक दूरध्वनी वाजला, एका जवळच्या, ओळखीच्या राजकारणी माणसाच्या नातेवाईकाची, अटकपूर्व जामिनाची मागणी होती, त्यांनी त्याची व्यवस्था केली आणि कार्यालयातील अधिकाऱ्याला त्या संबंधी जरूर ते आज्ञापत्र तयार करून ठेवायला सांगितले.

१२ वाजून गेले. बाहेर लोक वाट बघत असणार ह्याची कल्पना होती त्यांना. पण त्यांचा नाईलाज होता. न्यायदान सारख्या पवित्र कार्यात उगीच घाई करता येऊ शकत नव्हती.

ते वाट बघत होते, अपेक्षित निरोपाची. त्यांनी आपली संमती दिली होती त्याला आता आठवडा झाला आणि आज ती बातमी अपेक्षित होती. त्यांची आंतर राष्ट्रीय मानव अधिकार संस्थेच्या अध्यक्ष पदी निवड झाली होती, काही उपचार राहिले होते, तेही आठवड्यापूर्वी पूर्ण झाले होते. तसे झाले तर मग ते Washington ला स्थायिक होऊ शकले असते. ह्या अडाणी आणि भोळसट लोकात त्यांचे मन कधीच रमले नाही. golf, drinks, पार्ट्या आणि lectures हे त्यांचे जीवन होते.

त्यांचे कक्षापासून न्यायालयापर्यंत जाण्यासाठी एक लांबलचक मार्गिका होती. जाताना त्यांचा सर्व लवाजमा - किती अधिकारी, कारकून, शिपाई - बरोबर असणार. सगळयां सामान्य लोकांना वाटेतून बाजूला करून मार्गिका रिकामी केली जायची. त्यांच्या जाण्या-येण्यासाठी, प्रत्येक वेळी. ते देशातील सर्वात महत्वाचे पदाधिकारी होते. देशाच्या लोकशाहीचे आधारस्तंभ.

आजपर्यंत संपूर्ण न्याय व्यवस्थेतून आणि व्यवस्थेपासून अडाणी लोकांना वगळले होते, दूर ठेवले होते, म्हणून बरे, नाहीतर

त्यांनी वाटच लावली असती. कायदे, नियम - लिखित, स्वच्छ, स्पष्ट - नियम, अधिनियम, कलम, पोट - कलम, मान्य / अमान्य पुरावे, पुरावे सादर करण्यासाठी नियम, नियम उद्धृत करण्यासाठी नियम, किती शिस्तबद्ध जंजाळ. अडाणी लोकांना काय आणि कसे आणि किती समजावून सांगणार. त्यांना लांबच ठेवलेले बरे. आणि त्यांचा अर्थ लावणारे त्यांच्या सारखे अनुभवी जाणकार, त्यांच्यावर ही न्याय व्यवस्था टिकून होती. ह्या भोळसट लोकांसाठी न्यायाधीश म्हणजे देव होता. तारणहार.

आणि आज एका देवाने दुसऱ्या देवा विरुद्ध खटला दाखल केला होता.

न्यायमूर्ती दासागुप्ताना अपेक्षित निरोप आलाच नाही. शेवटी नाईलाजाने ते न्यायालयात जायला उठले. तेव्हढ्यात त्यांच्या घरचा शिपाई दुसरा निरोप घेऊन आला, न्यायमूर्तींच्या घरून त्यांच्या आजीने एक वस्तू पाठवली होती. ती एक दत्त मूर्ती होती. त्यांनी ती लगेच ओळखली. घरातल्या देवालयातील आजीची नित्य पुजेची मूर्ती होती. आजीने आज अचानक आता ही मूर्ती इथे का पाठवली. ते थोडे विचारात पडले. पण न्यायालयात पोहोचले तसे त्याने विचार झटकले आणि खटल्याची कार्यवाही चालू करायला सांगितली.

Attorney General नचिकेत ह्यांचा निरोप त्यांना सांगण्यात आला, ते वाटेतच होते, दुसऱ्या न्यायालयातील खटला संपवून अर्ध्या तासात पोहोचणार होते. त्यांनी एक उपचार म्हणून विचारले, फिर्यादी पक्षाच्या बाजूने कोण आले आहे आणि समोर एक सामान्यसा, थोडा बावरलेला, बुजलेला, माणूस उभा राहिला. त्याने स्वतःचे नाव विष्णू सोम सांगितले.

आता आश्चर्य करण्याची वेळ न्यायमूर्तींवर आली. विष्णू सोम ९१८ वर्षे वयाचा जिवंत माणूस समोर उभा होता. त्याने त्याला त्याचे आणि देवाचे काय नाते आहे असे विचारले. विष्णू सोम म्हणाला कि तोच देव होता आणि त्याला त्याचा खटला स्वतःच लढवायचा होता, त्याचा कोणी वकील नव्हता. त्याने तसे स्वतःचे प्रतिज्ञापत्र तयार करून आणले होते. न्यायमूर्तींनी त्याला ते सादर करायला सांगितले. तसे तो जागेवरून उठला आणि त्याने ते न्यायमूर्तींना देऊ केले. सर्व न्यायालयात एक नापसंती आणि उपहासाची लहर पसरली. न्यायमुर्तींचा एव्हढा अवमान. न्यायमूर्ती कधीही कोणतीही वस्तू / कागद स्वतःच्या हातून घेत नसतात. ते त्यांना त्यांच्च्या हाताखालचे अधिकारी / कारकून ह्यांच्याकडे सुपूर्द करावे लागतात. अगदीच अडाणी माणूस, कोर्टाचे प्राथमिक रिती रिवाज माहित नाहीत.

तोपर्यंत Attorney General न्यायालयात येऊन पोहोचले. फार बडे प्रस्थ होते, आणि कोर्टाबाहेर नचिकेत आणि दासगुप्ता ह्यांच्या मध्ये एक अलिखित शर्यत चालू होती.

आल्या आल्या नचिकेत ह्यांनी विष्णू सोम ह्यांच्या व्यक्ती - परिचयाचा प्रश्न उपस्थित केला.

विष्णू सोम : मी जन्मलो नसल्याने माझे असे कोणतेही परिचय पत्र नाही. ह्या खटल्यामध्ये ज्या देवळाचा संदर्भ देण्यात आला आहे ते देऊळ हे माझे घर / निवास स्थान आहे. आणि ह्या सगळ्या गोष्टी तुम्ही सर्व जाणता.

माझ्या परवानगी शिवाय तुम्ही परस्पर हा निर्णय कसा घेतला कि कोणीही, कधीही माझ्या घरातील माझ्या वैयक्तिक खोलीत यावे, जावे, फुले पाने ह्यांचा वर्षाव करावा, १० ठिकाणच्या १० वेळा वापरलेल्या बाटली मधून पाण्याचा अभिषेक करावा, कोठून तरी जमा केलेल्या भेसळ युक्त दुधाचा अभिषेक करावा. मला काही स्वातंत्र्य आहे कि नाही.

न्यायमूर्ती दासगुप्ता : पण संविधानाने हा अधिकार / हक्क सर्व भक्तांना दिला आहे. संविधान, देवाच्या अधिकारांबद्दल काहीही सांगत नाही.

विष्णू सोम : हे तुमचे संविधान काय म्हणते, We the People. .. .. .. .. . इथेच तर खरी गोम आहे. ह्या 'We the People' चे तुम्ही We the Judiciary, We the Politicians, We the Media People, We the Intellectuals, We the Historians, We the Creative Artists, We the Poets - Writers, आणि We the Students सुद्धा, असे आरडा ओरडा करणारे गट केले आहेत. त्यात माझे खरे भक्त - silent masses, माझे अडाणी भोळे पण माझ्यावर जीवापाड प्रेम करणारे ते कोठे आहेत. त्यांना काय म्हणायचे आहे हे कोणी त्यांना विचारले आहे, जाणून घ्यायचा प्रयत्न केला आहे. आता फक्त 'We the आरडा ओरडा करू शकणारे' ह्यांचेच संविधान राहिले आहे.

न्यायमूर्ती दासगुप्ता : तुम्ही न्यायालयाची बेअदबी करता आहात, मी तुम्हाला पहिली आणि शेवटची ताकीद देऊन ठेवतो. पुढच्या वेळेस कडक शिक्षा होईल.

विष्णू सोम : बघा ना. हि बेअदबी सुद्धा फक्त तुमची होऊ शकते, आमची नाही. कारण कोणत्याही व्यवस्थेपासून आणि व्यवस्थेमध्ये तुम्ही आम्हाला - सामान्य जनतेला - घेतलेच नाही. न्याय यंत्रणा असो, नागरी सुरक्षा यंत्रणा असो, राजकीय व्यवस्था असो, सार्वजनिक संस्थाने असो, सार्वजनिक कार्यालये असो,

सार्वजनिक जागा - जसे कि रस्ते, बागा, शौचालये, स्थानके, देवळे, सिनेमा गृहे, शाळा, दवाखाने, मोकळी मैदाने - असो, सगळीकडे आरडा ओरडा ब्रिगेड काम करताना दिसेल.

न्यायमूर्तींना भ्रष्ट म्हटले तर त्यांची बेअदबी होते, विद्यार्थ्यांना राजकीय हस्तक म्हटले तर त्यांची बेअदबी होते, Media Mogul ह्यांना Presstitute म्हटले तर त्यांची बेअदबी होते, राजकारण्यांना बुद्दू म्हटले तर बेअदबी होते, आणि Mafia ना राजकारणी म्हटले तर Mafia ची बेअदबी होते. बुद्धीवादी ह्यांना SECULAR नाही म्हटले तर त्यांची बेअदबी होते. आणि उच्च अधिकारी वर्तुळात प्रामाणिक हि एक शिवी झाली आहे.

आणि तुम्ही सगळे मिळून एक आरडा ओरडा ब्रिगेड बनवून माझे स्वातंत्र्य हिरावून घेणार. तुम्हाला हा अधिकार कोणी दिला.

न्यायमूर्ती दासगुप्ता : नचिकेत, AG, तुमचे काय म्हणणे आहे.

(एक भ्रमण ध्वनी वाजतो, वाजत राहतो. शिपायांची धाव पळ होते आणि प्रेक्षक कक्षातील एका माणसाकडून भ्रमण ध्वनी जप्त करण्यात येतो. शिपाई थोडा कडक पवित्रा घेत, दुसऱ्या माणसाला नीट बसायला सांगतो.’’पायावर पाय ठेवून बसू नका. पाय खाली करा.’’)

नचिकेत : संविधानाने सर्व भक्तांना दिलेल्या मुलभूत अधिकारांपैकी पूजा हा एक अधिकार आहे. पण संविधान मध्ये पूजेच्या भारतीय रूढी, परंपरा किंवा प्रचलित पूजा पद्धती ह्यांना काही स्थान नाही. ह्या गोष्टी संविधानातील मुलभूत हक्कांवर बंधने आणू शकत नाही. माझ्या लिखित submissions मध्ये मी सर्व कायदेशीर तरतुदींची बारकाईने चर्चा केली आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे संविधान देवाचे अस्तित्व मान्य करत नाही. हे SECULAR STATE आहे.

विष्णू सोम : आताच म्हणजे, आज रोजी राम नवमी च्या दिवशी १३. ०५ वेळेवर हाती आलेल्या सर्वेक्षणा नुसार १२४, ८५, ४४, ९३८ एव्हढ्या लोकसंख्येपैकी ८१. ६७% लोकांचा देवावर म्हणजे माझ्यावर विश्वास आहे. त्या लोकांच्या नावांची पत्त्यासकट यादी ह्या pen drive मध्ये दिलेली आहे. Mr. Attorney General ह्यांनी 'चित्रगुप्त' ह्या जग प्रसिद्ध संस्थेचे नाव ऐकले असेल तर त्यांनीच हा अहवाल दिला आहे. न्यायमूर्तींनी त्याचा विचार करावा. संविधान लोकांचे कि लोक संविधानाचे असा एक किरकोळ प्रश्न मला इथे उपस्थित करावासा वाटतो.

ह्या अहवालाची एक प्रत AG च्या कार्यालयात e-mail करण्यात आली आहे आणि त्या e - mail ची एक प्रत हि घ्या.

न्यायमूर्ती आणि AG दोघेही अवाक झाले, ह्या pagan माणसाकडून एवढ्या कार्यक्षमतेची आणि finesse ची अपेक्षा नव्हती.

न्यायमूर्ती दासगुप्ता : (एका दीर्घ शांततेनंतर) हा अहवाल न्यायालयाच्या पटलावर घेण्यात येत आहे, त्याचा अभ्यास करून AG नी त्यांचे म्हणणे ३ दिवसात न्यायालयाला सादर करावे.

*******

त्या नंतर तारखांवर तारखा पडल्या. त्यात २४९ दिवस निघून गेले. इकडे विष्णू सोम मात्र हैराण झाला, फुले, पाने, पाणी, दुध ह्याच्या अवेळी वर्षावाने त्याची झोप उडाली, पण न्यायालयात त्याचा खटला सुनावणीस येईना.

शेवटी २५० व्या दिवशी सुनावणी पुन्हा चालू झाली.

नचिकेत : चित्रगुप्त संस्थेचा अहवाल सरकारला स्वीकारता येत नाही. कारण त्याला १८. ३३% Minority चा विरोध आहे.

न्यायमूर्ती दासगुप्ता : तसा तुमच्याकडे काही पुरावा, प्रती-अहवाल असेलच, तर तो न्यायालयापुढे सादर करावा.

नचिकेत : हो, माझ्याकडे काही वर्तमान पत्रातले लेख, बातम्या आणि काही मान्यवर Minority पुढाऱ्यांचे वक्तव्य आहेत, ती My Lord माझ्या प्रतिज्ञा पत्रासोबत जोडली आहेत.

विष्णु सोम : म्हणजे आरडा ओरडा ब्रिगेड च्या नाट्य संहितेला न्यायालय ठोस पुरावा समजते कि काय. ह्या प्रश्नावर जन गणना का केली जात नाही. मी माझ्या बाजूने जन गणना करून जो अहवाल सदर केला तो ह्या नाट्य संहितेने रद्द ठरत नाही.

नचिकेत : फिर्यादी पक्षकाराने माझ्या बोलण्यात अडथळा आणू नये, अशी न्यायालयाने त्यांना ताकीद द्यावी. ते स्वतः एक यःकश्चित देव, ३३ कोटी देवांपैकी एक मात्र देव आहेत. बाकीच्या देवांनी अशी फिर्याद अजून पर्यंत केल्याचे ऐकिवात नाही. देव आहात, देवासारखे गप्प बसा. तुम्हाला तुमचे उत्तर मांडण्याची संधी मिळेल.

न्यायमूर्ती दासगुप्ता : तुमच्या submission ची एक प्रत फिर्यादी पक्षाला १५ दिवसात देण्यात यावी. त्यावर फिर्यादी पक्षाने आपले उत्तर पुढील ३० दिवसात न्यायालयात सादर करावे.

********

AG च्या तारखा, न्यायमूर्तींच्या तारखा ह्यांचा मेळ घालून पुढची तारीख ६५ दिवसांनी आली आणि सुनावणी पुढे चालू झाली.

विष्णू सोम : न्यायालयातील हि दिरंगाई पाहून पटते कि काळ अनंत आहे आणि विनामूल्य ही आहे. AG ह्यांची submission आणि संबंधितांची मत-मतांतरे वाचली. ज्यांना हजार वर्षात आपला पोशाख सुद्धा बदलता आला नाही, त्या न्याय व्यवस्थेने लोकांना एका रात्रीत आपली मने बदलायला सांगावे हे विचित्र आहे. समाजाच्या विचार धारेपासून ते किती दूर आहेत ते त्यामुळे जाणवते.

संविधान तयार व्हायच्या आधीपासून मी आहे आणि माझ्या पूजा-अर्चा संबंधी च्या पद्धती किंवा रूढी / परंपरा सुद्धा संविधानाच्या आधीपासून आहेत. संविधान नंतर झाले. म्हणून आधीच्या पद्धतीनं संरक्षण देण्यात यावे, जर त्यामुळे कोणाचे नुकसान होत नसेल, कोणावर अन्याय होत नसेल, कोणावर बळजबरी होत नसेल. शेवटी AG म्हणाले त्याप्रमाणे प्रत्येकाला ३३ कोटी पर्याय आहेत. एका माणसाची इच्छा किंवा काही थोड्या लोकांची इच्छा पूर्ण नाही झाली तर सर्व स्वातंत्र्य संपले असे मानायचे काही कारण नाही. लोकशाहीत १००% एकमताची

अपेक्षा नाही. आरडा ओरडा ब्रिगेड ने आपली नाट्य संहिता प्रेक्षकांवर लादणे बंद करावे.

महत्वाची गोष्ट हि आहे. जे पूजा अर्चेचा हक्क सांगतात ते देवाला सुद्धा दगड, जड मूढ समजतात आणि अज्ञानाने दगडाच्या पूजेसाठी अकांड तांडव करतात. उलट जे भक्त दगडामध्येही देवत्व ओळखतात ते कर्म कांड सोडण्याचा प्रयत्न करतात, माझी मानस पूजा करतात आणि समाधान मिळवतात. संविधान दगडाला मान्यता देते, देवत्वाला नाही, हि खरी शोकांतिका आहे. माझे खरे भक्त प्रेमाने मला जिंकून घेतात, हक्काने बांधत नाहीत.

आणखी एक महत्वाची गोष्ट. प्रत्येकाची श्रद्धा म्हणजे त्याचा माझ्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे, तो बदलण्याचा दुसऱ्याला हक्क नाही, आणि हा देव आणि माणूस ह्यांच्या नात्यातला मुलभूत नियम आहे.

AG नी युक्तिवाद तर चांगला केला, कायद्याच्या चौकटीत राहून. पण अध्यात्मिक अधिकाराशिवाय त्यावर बोलणे म्हणजे पुराव्याशिवाय खटला लढवणे आहे. कायदा नैतिकतेचा एक भाग आहे, आणि नैतिकता अध्यात्मावर आधारित आहे, हि मूलगामी गोष्ट AG विसरले कि आरडा ओरडा ब्रिगेड च्या प्रभावाखाली आले ते त्यांनाच ठाऊक.

तुकारामाला दर्शन नाकारले तर तो उपोषणाला नाही बसला, त्याने त्या विरुद्ध आरडा ओरडा नाही केला, आणि समाजाला वेठीला नाही धरले. मग मला राहवले नाही, मीच पायउतार होऊन त्याच्या दर्शनाला गेलो. अध्यात्मिक आधारावर सामाजिक बदल होतात, कायद्याने, बळजबरीने नाही.

म्हणून मला असे वाटते कि संविधानाचा अर्थ लावताना मोठी गडबड झाली आहे आणि ती दुरुस्त करण्यात यावी अशी माझी न्यायालयाला कळकळीची विनंती आहे. संविधान लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी लिहिलेले असावे, लोकांच्या रूढी, परंपरा आणि विश्वास ह्यावर आधारित असावे, देव आणि माणसाच्या नात्यामध्ये अनावश्यक व्यत्यय आणू नये. ही विनंती.

न्यायमूर्ती दासगुप्ता : न्यायालयाने दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले आहे. निर्णय उद्या देण्यात येईल.

********

आज न्यायालय लोकांनी भरून ओसंडून वाहत होते. उत्सुकता शिगेला पोहोचली होती. न्यायमूर्ती दासगुप्ता घाई घाईने आले आणि आपल्या कक्षात न जाता तडक न्यायालयात गेले. खटल्याची कारवाई लगेच चालू करण्यात आली.

न्यायमूर्ती दासगुप्ता : न्यायदानाच्या इतिहासात हा एक अनोखा, विचित्र खटला आहे. माणूस आणि देव ह्यांच्यातील नात्याच्या गाभ्याला हात घालणारी ही एक अवघड गोष्ट होती. आणि त्यामुळेच ही प्रत्येक माणसाची स्वतःची अशी वैयक्तिक गोष्ट सुद्धा होती. विष्णू सोम ह्यांनी थेट माझ्या अंतर्मनाला साद घातली आणि तिला प्रतिसाद देण्यासाठी मला माझ्या आजीने मदत केली.

मी आयुष्यात जेंव्हा संकटात सापडलो तेंव्हा मी देवाची मदत मागितली होती आणि प्रत्येक वेळी देवाने मला तारून नेले होते, वाचवले होते, मी त्याचा उपकृत आहे. म्हणून मी हा खटला आजपासून, आताच सोडतो आहे, मला ह्या खटल्याचा निर्णय करण्याचा अधिकार नाही.

*******

शेवटी विष्णू सोमचा प्रश्न सुटला नाही. तसाच अनादी काळापासून लोंबकळत पडला आहे. प्रत्येक वेळी नवे राज्य आले कि नवे संविधान आणि नवे न्यायमूर्ती.

तुकारामाने वाट दाखवली तरी ती अवघड वाट चालण्याचे कष्ट कोणी घ्यावे. पावित्र्याची ऐशी तैशी, पण पूजेच्या अधिकाराची मात्र सरशी झाली. चार रुपये आणे पैसे व दोन दिवसांची प्रसिद्धी

मिळाली आणि तीही फक्त आरडा ओरडा करून तर कोणाला नको आहे.

संविधानाचा एक नवीन दबाव गट तयार झाला.

'पूजा स्त्री पुरुष समान हक्क गट'

# शेतावरल्या प्राण्यांची गोष्ट

(समुद्र मंथनातून सर्व प्रथम हलाहल विष बाहेर आले. तसे स्वातंत्र्याच्या लढ्यात अहिंसा आणि निधर्मीपणाच्या खुळचट कल्पना वर आल्या. त्यांनी उपोषण आणि मौन अशी नवी रूपे धारण केली. अध्यात्माचा पंचा नेसला, त्यामुळे लोकांची फसगत झाली. पहाटेपूर्वी काळोख दाटला. स्वर्णिम, तेजस्वी, सूर्योदयाबरोबर मंगलमय प्रभातीचे स्वप्न अजून लांबले.)

---

ही गोष्ट आहे एका शेतावरची. तिथे राहणाऱ्या प्राण्यांची. त्यांच्या मालकाची आणि मालकाच्या माणसांची. सुजल, सुफल, शेताची, काळया आईची.

शेत चारी दिशांनी विशाल, अतिशय विस्तीर्ण, विराट, विविधतेने नटलेले आहे. त्याच्या एका बाजूला आहे उंच आणि लांब पसरलेला कडा. पावसाळ्यात असंख्य पाणलोट कड्यावरून खाली उडी घेतात. पण तळाशी पोहोचण्यापूर्वीच वाटेत शतशः विदीर्ण होऊन हवेत विरून जातात. उन्हाळयात कित्येक वादळे कड्याशी धडका घेतात. पण निम्मी उंची गाठेपर्यंत त्यांची इतकी दमछाक होते कि नंतर ती दिसेनाशी होतात. कड्याच्या पायथ्याला, शेताच्या वरच्या अंगाला आहे, वळणे वळणे घेत जाणारी एक

महाकाय नदी. तिचे पात्र इतके विस्तृत आहे कि पलीकडचा काठ, किनारा दिसत नाही. कड्याच्या पोटात, एका कपारीत आहे एका गरुडाचे घरटे. दुर्गम आणि दुरून अदृश्य. तिथून संपूर्ण शेत एका दृष्टीक्षेपात येते आणि शेतावरची बारीकशीही हालचाल गरुडाच्या नजरेतून सुटत नाही.

हा गरुड म्हणजे आहे पुराण पुरुष इथल्या प्राण्यांचा. त्याच्या पंखांचा पसारा दहा हात लांब आहे आणि पायात हत्तीचे बळ आहे. शेतावरच्या प्राण्यांचा तो मोठा आधारवड आहे. तोच एकटा असा आहे, जो जमिनीवरून एका झेपेत उंच कड्याला लंघून जाऊ शकतो.

ह्या गोष्टीचा आणि सर्व घटनांचा तो एकमेव साक्षीदार आहे. त्याच्यासमोर सारे घडले, उलगडत गेले. त्याने सारे पाहिले, अनुभवले, आणि पुढच्या पिढीस सांगितले.

ती ही शेतावरच्या प्राण्यांची गोष्ट.

********

शेतावर खूप निरनिराळे प्राणी राहत होते. शेळ्या, मेंढ्या, बकऱ्या, बदके, कोंबड्या, डुकरे, गायी, म्हशी, अशा दुध-दुभत्या आणि मांस देणाऱ्या प्राण्यांची शेतावर सर्वात जास्त वस्ती होती. त्यांच्याबरोबर घोडा, गाढव, खेचरे अशी उमदी कार्यशील जनावरे

मोठ्या संखेने होती. त्यांच्यामुळे शेतावर सतत हालचाल होती. निष्ठावान राखणदार कुत्री होती. बैल आणि रेडे ह्यांची सुद्धा शेतावर मोठ्या प्रमाणावर पैदास होती. असे शक्तिमान प्राणी शेतावरल्या पाणचक्की मधून पाण्याचा उपसा करण्याची जबाबदारी सांभाळत असत. शिवाय कावळे, चिमण्या, राघू - मैना, कबुतरे, मोर, साळुंक्या, खंड्या, शेतावरील शांततेची जाणीव करून देत असत. अ. ज्ञा. नी. (अनुभवी, ज्ञानी, नीतिमान) घुबडे रात्रीच्या अंधारातून शेतावर नजर ठेवून असत. ससे, हरणे, माकडे, कोल्हे ह्यांचा शेतावरील वावर पिक पाण्याच्या वेळेस वाढत असे. कधी कधी कड्याखालच्या रानातून वाघ, चित्ता, लांडगे, भेटायला येत. मालक आणि त्याची माणसे तर वस्तीलाच होती कायमची.

पण शेतावर सर्वात जास्त भय कोणाचे असेल तर ते जंगली लांडग्यांच्या आक्रमणाचे. कळपाने हल्ला, हत्या करणारे. क्रूर आणि कपटी.

शेताचा विस्तार चारी दिशांना शेकडो योजने दूरवर पसरला होता. शेताच्या समृद्धीची कीर्ती जगात गाजत होती. पण शेतावरचे प्राणी आपापले जिणे आणि जगण्याचे ओझे घेऊन जगत होते, मरत होते, मालकाच्या दयेवर.

********

शेताचा नवीन मालक होता एक उंच, कृश, गोरा माणूस, नाक बाकदार, पुढे आलेले, निळे डोळे, जाडजूड बोटे, आखूड हात, हातात कायम चाबूक, खांद्यावर मोठी आवाज करणारी नळी. त्याची माणसे सुद्धा सगळी त्याच्यासारखीच, चाबूक आणि नळी हीच त्यांची ओळख.

शेताच्या मध्यभागी एक छोटेसे टेकाड होते. त्यावर मालकाने घर बांधले होते. ऐसपैस, पसरलेले. टेकडावर एक टेहळणी मनोरा होता. परसात एक मोठी विहीर बांधली होती. घराच्या चोहो बाजूस प्रशस्त आंगण होते. आंगणात तऱ्हे तऱ्हेची फुलझाडे होती. संपूर्ण घर, अंगणाला उंच भिंतीचे कुंपण होते. आत बाहेर करायला एकच रस्ता होता, प्रवेश द्वार उंच लोखंडी दरवाजाने बंद असे. त्याच्या पलीकडे प्राण्यांना प्रवेश नव्हता.

मालकाची आणि त्याच्या माणसांची भूक कधीच भागत नसे. ते चिडले तरी, किंवा खुशीत असले तरी, नळीमधून असंख्य आवाज काढीत आणि त्यामुळे कितीतरी प्राणी मरत, जखमी होत. शेतातून अनेक लहान मोठे ओढे वाहत होते. अनेक ठिकाणी खोलगट जागी तळी झाली होती. त्यातून प्राण्यांची तहान भागत असे. हे मालकाच्या माणसांच्या चांगलेच लक्षात आले होते आणि

ते कधीही अवचित येत, तहानलेल्या प्राण्याला पकडत, शिकार करत, किंवा नळीतून मोठ मोठे आवाज काढून पळवून लावत.

एके दिवशी मालकाने हुकुम काढला, शेतावरचे गवत कापून त्याचे भारे बनवायचे. आठवड्यात सर्व शेत उघड्या बोडक्या उजाड माळरानासारखे झाले. गवताच्या भाऱ्यांचा डोंगर झाला. मग एक मोठी आगबोट आली आणि सर्व भारे आपल्या पोटात घेऊन निघून गेली. शेतावरच्या प्राण्यांना चारा कमी पडू लागला. सगळे प्राणी त्रस्त झाले. भुकेने इतस्ततः फिरू लागले चाऱ्याच्या शोधात. वणवण झाली फार. घोड्यांनी चौफेर फेरी घातली. शेताच्या कुंपणापर्यंत, नदीपर्यंत, कड्यापर्यंत, आणि बातमी आणली कि खाली, सपाटीवर चारा कुठेही शिल्लक नाही. पर्वतावर, कड्याच्या बाजू बाजूला जिथे मैदाने होती, तिथे उंचावर गवत कापले नव्हते. पण तिथे जाणे अवघड होते. नवीन अंकुर येईपर्यंत प्राण्यांना उपासमार झाली. कित्येक छोटे, अशक्त जीव, वासरे, पिले, म्हातारी जनावरे मेली. पण मालकाला पर्वा नव्हती. शेतावर कत्तलखाना धडाडत होता.

ज्यांना तहान भूक सहन झाली नाही त्यांनी नाईलाजाने नदीतील विषारी गवत खाऊन भूक भागवण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे त्यांची पोटे, घसा आणि सर्व शरीर विष ग्रस्त होऊन हाल

हाल झाले. मग त्यांना गरुडाने उचलून पर्वतावरील मैदानात नेले. तेथे शुद्ध पाणी, हवा आणि कोवळे लुसलुशीत गवत ह्यामुळे त्यांची प्रकृती हळू हळू सुधारली आणि ते वाचले.

दर ४ – ५ महिन्यांनी चारा कापला जायचा, दूर परदेशी पाठवला जायचा. प्राणी रोडावले. त्यांची शक्ती कमी झाली. त्यांच्याकडून कामे उरकेनात वेळच्या वेळी. तसे चाबकाचे फटके बसू लागले. वासरांच्या वाटेला पुरेसे दुध येईना. माणसे निर्दय झाली. निसर्ग मात्र सदयचं राहिला. दर वर्षी पिक पाणी जोमाने येत होते. शेतावरच्या समृद्धीला ओरबाडून मालकाने विद्रूप केले, लुटून नेले तरी उरलेल्यावर प्राण्यांचे कसे बसे भागत होते.

पण त्यात भर पडली शिकारयांची. मालकाने कातडी, शिंगे आणि रुचकर मांस ह्यासाठी शिकारीला मोकळीक दिली.

**********

त्या दिवशी तर कहरच झाला.

मध्यान्हीची वेळ होती. पाउस नुकताच पडून गेला होता. नदीकाठी, उतारावर, कुरणात काळविटांचा एक कळप स्वच्छंदपणे चरत होता. त्यांची शिंगे उन्हात उठून दिसत होती. अंगावरची तजेलदार कांती आणि ठिपके सोनसळी गवतात चमकत होते. पाडसे उंच उड्या घेत, बागडत होती. आकाश निरभ्र होते. शांत

वातावरणात पावसा नंतरचा उल्हास आणि उत्साह भरला होता. चरता चरता मान वर करून ते कानोसा घेत होते. एक क्षण सारा कळप स्तब्ध झाला, पण उशीर झाला होता. मोठा आवाज होऊन सर्वात पुढचा काळवीट खाली पडला. पाण्यात रक्ताचा रंग मिसळला. कळप चौखूर उधळला, पांगला. परत मोठा आवाज झाला आणि आणखी एक काळवीट पाय झाडत खाली पडला. बुटाने गवत तुडवत, पाणी उडवत आणि शिळ घालत शिकारी जवळ गेला. आपल्या नेमबाजीवर तो खुश होता. नळीनेच काळविटाला हलवत तो अंदाज घेऊ लागला. वजन आणि कातडी बघून तो आनंदाने हसला. शिकाऱ्याने पुढची व्यवस्था करायला सांगितली आणि तो निघून गेला. हळू हळू मजुरांच्या हाका कमी कमी होत गेल्या.

पांगलेला कळप परत काही अंतरावर चरू लागला. तेव्हढ्यात दबा धरून बसलेले जंगली लांडगे चहू बाजूने आले आणि त्या काळवीटाना घेरून, त्यांनी जो हल्ला केला, तो फार भीषण होता. एकूण एक काळवीट शिकार झाले, पाडसे आणि गाभण माद्या सुद्धा बळी पडल्या. पाण्यातला रक्ताचा रंग अधिकच गडद झाला.

इकडे जसे शिकारी व त्याची माणसे परतली तसे त्यानी कोंबड्या, बकऱ्या आणि डुकरे ह्यांना पकडून, पकडून, खुराड्यातून

बाहेर काढून कसायांच्या ताब्यात दिले. त्या दिवशी प्रत्येक प्राण्याचे कोणी न कोणी मारले गेले. कत्तलखाना दोन दिवस अहोरात्र धडाडत होता. मांसाचा डोंगर झाला. त्याला पोटात घेऊन आगबोट कोठेशी निघून गेली.

शिकारी आणि मालक आता आठवड्यातून दोन तीन वेळा शिकार करू लागले. हाकारे पेटारे, ढोल ताशेवले, मजूर, आणि शिकारी कुत्रे ह्यांच्यामुळे शेत दणाणून जाई. डुकरे, ससे, हरणे, बदके, पाण कोंबड्या ह्यांची शिकार तर सारखीच होत असे. पण कधी शिकार मिळाली नाही तर बकऱ्या आणि कोंबड्या ह्यांची सर सकट कत्तल होई. शेतावरील प्राण्यांचे जिणे अवघड झाले. घोडे, गाई, म्हशी, गाढवे, खेचरे ह्यांना सुद्धा शेतावर फिरणे भीतीदायक झाले.

शेतावरले प्राणी चिडले, रडले, पिसाळले. पण काही उपाय सापडला नाही. परिस्थितीत फरक पडला नाही. मालकाच्या गुलामीत, जोखडाखाली, कैदेत जीव नकोसा झाला, वासरा, पिलांसाठी व्याकुळला. पोटाच्या आगीत आणि शिकारीच्या भीतीत, होरपळलेले प्राणी मूक आक्रोश करू लागले.

ते बघून गरुडाने सगळ्यांना एकत्र बोलावले. तो शक्तिमान गरुड प्राण्यांना म्हणाला :

“मित्रानो, हे शेत आपले आहे. पिढ्यानपिढ्या आपण येथे सुखाने नांदत आलो आहोत. मालक परका आहे, उपरा आहे. आपल्याला पोटभर अन्नाचे आश्वासन देऊन गुलाम केले आहे. आपण त्याच्या बोलण्यास भुललो, फशी पडलो. आता अन्नही पोटभर मिळत नाही आणि जिवाचीही शाश्वती नाही. आपल्यातल्या काही जणांना मालकाने आपल्यापासून तोडले, फोडले, जोडले आणि तेच आता त्याच्या वतीने आपल्यावर हुकुमत गाजवू लागले आहेत. तर काहीजण त्याच्यासाठी जीव तोडून मेहनत करत आहेत. हे प्रथम थांबले पाहिजे. ते आपल्यात परत आले पाहिजेत. त्यांनी मालकाचा कावा ओळखला पाहिजे. विरोध केला पाहिजे. विशेषतः राखणदार कुत्रे, पाणी उपसणारे रेडे, बैल, वाहन वहाणारे घोडे, गाढव आणि खेचरे ह्यांना मी आवाहन करतो कि त्यांनी मालकाची कामे सोडून द्यावीत. आपली एकजूट झाली तर मालक एक दिवसही इथे राहू शकणार नाही. मालकाच्या अत्याचारांना जशास तसे उत्तर, प्रतिहल्ले, असहकार आणि एकजूट ह्यांनी उत्तर द्या. मालकाला पळवून लावणे काही अवघड नाही.”

ते ऐकून लांडगे उभे राहिले आणि त्यांनी आपल्या मागण्या मांडल्या.

“ह्या शेतावर आमचा पण हक्क आहे. आमच्या मागण्या मान्य झाल्या तर आम्ही तुमच्या लढ्याला पाठींबा देऊ, नाहीतर आमची मालकाविरुद्धची लढाई वेगळी राहील. ’ आणि ते निघून गेले.

लांडग्यांचा हा तमाशा सर्व प्राणी चुपचाप बघत राहिले. तेंव्हा तो शक्तिमान गरुड सगळ्या प्राण्यांना उद्देशून म्हणाला :

“मला माहित आहे, लांडगे ह्या शेताचे रहिवासी नाहीत. ते पण मालकासारखे उपरे आणि तितकेच आक्रमक आहेत. तुम्हाला लांडग्यांच्या क्रौर्याचे भय फार आहे. म्हणून तुम्ही त्यांच्या दबावाला बळी पडता. त्यांची तुमच्या विरुद्धची सततची आगळीक सहन करता. पण एक दिवस तुम्हाला त्यांच्या बद्दल काहीतरी ठरवावेच लागेल. कलहाला घाबरून कसे चालेल. कटू असले तरी, सत्य हे परखडपणे सांगावेच लागेल.

हे शेत आपले आहे. त्याच्यासाठीचा लढा आपला आहे, तो आपल्यालाच लढावा लागणार आहे. सावधान असा, एकजूट वाढवा. काळ्या आईचा आणि आपल्या शेताचा विजय असो.”

सगळ्या चित्र विचित्र प्राण्यांची एकत्र मोट बांधणे अवघडच झाले. पण काही तरुण, उत्साही प्राणी कधी एकेकट्याने तर कधी एकत्र येऊन, जसा जमेल तसा, मालकाचा प्रतिकार करू लागले.

काही उमदे, ताकदीचे घोडे शेत सोडून गेले. काही राखणदार कुत्र्यांनी मालकाची साथ सोडून दिली. ते लहान लहान प्राण्यांना जंगली लांडग्यांच्या हल्ल्यापासून वाचवू लागले. रेडे आणि बैल मालकाचे चाबकाचे फटके खात पाणी उपसत राहिले.

जसा प्रतिकार होऊ लागला तसे मालकाची माणसे घाबरायला लागली. एकटी दुकटी न फिरता जमावाने हिंडू फिरू लागली. मग मालकाने माणसे वाढवली. प्रत्येकाला नळी दिली. राखणदार कुत्र्यापेक्षा नळीवर त्याचा जास्त भरोसा दिसू लागला. मालकाने लांडग्यांना ही शिकारीस परवानगी दिली. मालकाचे अत्याचार वाढले, त्यात क्रौर्य आणि उपासमार ह्यांचे भय भरले. बोटींची संख्या आणि खेपा वाढल्या. शिकाऱ्यांनी ओढत नेल्यामुळे शेतात मरणाच्या पक्क्या पायवाटा तयार झाल्या.

मारहाण, उपासमार आणि मृत्यूचा रोज सामना करत, कालचा दिवस बरा होता असे म्हणत प्राणी जगू लागले.

*********

एक दिवस शेतावर एक अनाहूत पाहुणा आला. तो एक साधारणसा, दिसायला अगदीच कृश, पिसे झडलेला कोंबडा होता. तो खूप लांबचा प्रवास करून आला होता. त्याच्या डोळ्यात एक चमक होती. चालण्यात एक ऐट होती. पण सर्वात वेगळेपण होते ते

त्याच्या रंगात. बाकीच्या कोंबड्यान प्रमाणे तो लाल, पिवळा, करडा नव्हता. तो शुभ्र पांढरा कोंबडा होता. त्याच्या कृश शरीरावर त्याचा शुभ्र तुरा डोलत होता. त्याच्या भोवती सारे प्राणी जमले, त्यांनी त्याची विचारपूस करायला सुरुवात केली. पण तो म्हणाला, मी काही हेतूने इथे आलो आहे, प्रत्येकाला वेगळी ओळख करून देण्यापेक्षा सगळयांना एकदमच ओळख करून दिली तर बरे. मग संध्याकाळी सूर्यास्ताला सगळयांनी जोंधळयाच्या खळयावर जमावे असे ठरले आणि तो नवागत प्रवासाचा शीण घालवण्यासाठी आराम करायला गेला.

संध्याकाळ झाली तसे प्राणी मोठ्या उत्सुकतेने जमू लागले. एका राजबिंडा तरुण, कोंबड्याने सर्व प्राण्यांना निरोप पोहोचवण्याची व्यवस्था केली होती. सगळे गोळा झाले, अगदी लांडगे सुद्धा. विषय जिव्हाळयाचा होता. सांगणारा नवीन होता. बुडत्याला काडीचा आधार होता.

एखाद्या नेत्याच्या आवेशात आणि जगतजेत्याच्या आत्मविश्वासात पाहुणा उभा राहिला.

“मी कित्येक शतक योजने दूर, ह्या पर्वताच्या सावलीच्याही पलीकडे आणि वळणा वळणांनी धावणाऱ्या नदीकाठच्या मैदानाच्या पलीकडे असलेल्या शेतावरून आलो आहे. जगातील

सर्वच शेतावरील सर्व प्राण्यावरील अन्याय आणि गुलामगिरी दूर करण्यासाठी आलो आहे. माझ्याजवळ एक वेगळा, क्रांतिकारी विचार व उपाय आहे. त्याने तुम्ही आम्ही आपण सर्व स्वतंत्र होऊ. मालकाच्या जोखडाखालुन मुक्त होऊ.

आतापर्यंत तुम्ही स्वातंत्र्यासाठी खूप लढा दिलात. त्याग केलात. विद्रोह केलात. तसेच मालकावर, माणसांवर हल्ले केलेत. त्यांना जखमी केलेत, ठार मारलेत. पण परिणाम काय. अत्याचार वाढले. ना तुम्हाला शांती मिळाली, ना स्वातंत्र्य मिळाले. ना स्वस्थता मिळाली, ना जीवनाची हमी मिळाली. ह्याचा तुम्ही कधी शांतपणे विचार केलात का. तुमचा सर्वात मोठा उठाव, जो मागच्या दुष्काळानंतर झाला, त्या नंतरही परिस्थितीत फरक पडला नाही. शेतावरचा कत्तलखाना धडाडतो आहेच. मांस, दुध, भाजीपाला, फळे, गवत आठवड्यातून चार वेळा बाहेर पाठवला जातो आहेच. आपल्या तोंडचा घास हिरावून घेतला जातो आहे. घोडागाडीच्या ओझ्याने घोडे टेकीला आले आहेत. म्हाताऱ्या मोतीला गोळी घातली गेली. तरुण चेतक श्रम आणि उपासमारीने खंगत चालला आहे. बैलांच्या पाठीची साले निघाली तरी मालकाचे फटके बसतातच आहेत. जमिनीला तर विश्रांतीच नाही.”

“होय, खरे आहे. अगदी मनातलेच बोललात.” सगळीकडून एकच होकारा आला. वक्त्याने श्रोत्यांच्या मनातली दुखरी तार पिरगाळली होती.

“मग आम्ही करावे तरी काय.”

“तुमच्च्या त्या दूरच्या शेतावरून कांही मदत मिळेल का.”

“कोणी 'किमयागार' येईल का. कोणी तारणहार येईल का.”

तेंव्हा तो शक्तिमान गरुड शांत, धीर गंभीरपणे म्हणाला.

“आपल्या सर्व अनर्थाचे मुळ कारण आहे बेकी, आपल्यात एकी नाही. एकदिलाने काम करण्याची पद्धत नाही. एकत्रित इच्छाशक्ती नाही. आपण सर्व जर एक होऊ, तर त्या मालकाला पळवून लावायला काय तो उशीर. एक म्हणून उभे राहू, एक म्हणून जगू, एक म्हणून लढू, किंवा मरू. एकेकट्याने फक्त हारू आणि मरू. स्वातंत्र्याचा लढा एकजुटीनेच लढला जातो. शस्त्राला किंवा निःशस्त्रालाहि विजयी करणारी असते एकीची शक्ती. प्रेमाची आणि त्यागाची शक्ती.”

तेंव्हा तो राजबिंडा तरुण कोंबडा म्हणाला,”थांबा, आपण प्रथम पाहुण्याचा तो नवा विचार आणि उपाय ऐकू या.”

पाहुण्याने मग गरुडाकडे एक अस्वस्थ नजर टाकत बोलणे परत चालू केले.

“मला वाटत, आपण अगदी परंपरागत विचारांची झापडे डोळ्यावर बांधून हा लढा चालवत आहोत. जगात नवीन विचारांची वादळे घोंघावत आहेत. क्रांती उंबरठ्यावर दार ठोठावत आहे. अखिल मानव जात आणि संपूर्ण प्राणी जगत हातात हात घालून शांती व समृद्धीच्या नव्या पहाटेचे स्वागत करण्यासाठी सिद्ध आहे. तेंव्हा आपल्या मुक्तीचे प्रयत्न नव्या प्रेरणेने, नव्या दिशेने व नव्या उत्साहाने केले पाहिजेत.

आता मी तुम्हाला माझा नवा विचार सांगतो.

मालक म्हणजे मानव प्राणी हा पृथ्वीवरील समस्त प्राणी जगताचा एक भाग आहे. त्याला सुद्धा पोट आहे. मादी आणि पिल्ले आहेत. त्याचा आणि आपला जुना संबंध आहे. मित्रानो, तो उत्क्रांतीच्या टप्प्यावरचा आपला मोठा भाऊ आहे. मग मालक आणि आपल्यात हे वैर का, हे शत्रुत्व का.”

त्याबरोबर श्रोत्यांमध्ये चांगलीच खळबळ माजली. परत एकदा त्या राजबिंडा तरुण कोंबड्याने आवाहन करून शांतता प्रस्थापित केली.

पाहुण्याने बोलणे पुढे नेले.

“आतापर्यंतचे माझे विचार तुम्ही शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. मझा हा ठाम विश्वास आहे कि मालक आपला शत्रू नाही तर मित्र आहे. जर तो चुकत असेल तर त्याचे ह्रीदयपरीवर्तन केले पाहिजे. त्याला त्याच्या स्वतःच्या अधोगतीपासून वाचवले पाहिजे. आपल्या परिस्थितीवरही हाच एक तोडगा आहे.

मालकाचे ह्रीदयपरीवर्तन हाच एकमेव उपाय आहे, हाच एकमेव मार्ग आहे आपल्या स्वातंत्र्याचा, आपल्या मुक्तीचा.

ह्रीदयपरीवर्तन एक किमया आहे, आणि जरी ती मला पूर्ण साध्य झाली नसली, तरी मी जे सत्याचे प्रयोग केले आहेत त्यावरून खात्रीने सांगू शकतो कि ही किमया असाध्य नाही. मी ह्रीदयपरीवर्तनाचे तंत्र आणि शास्त्र अवगत केले आहे. तेच मी तुम्हाला आणि जगाला आवाहन करतो आहे.”

सगळीकडे एक दुर्बोध शांतता पसरली. पाहुण्याची नजर आढ्याला खिळली.

तेंव्हा तो शक्तिमान गरुड म्हणाला.

“ज्या शस्त्राची धार कधी तपासली नाही, जे कसे वापरतात ते माहिती नाही, ते घेऊन आपण कोणता लढा, कसा देणार आहोत. फक्त धुरळा उडवणाऱ्या वाऱ्यात, वादळी उन्मादाचा आवेग भरला

तर वाटेतल्या वस्तुमात्रांची दिशाहीन फरपट कशी होते ते आम्हा - वाऱ्यावर आणि वादळावर स्वार होणाऱ्या गरुडानाच माहित आहे. ज्यांना नीट उडताही येत नाही, त्यांना तो अनुभव नसणार हे साहजिक आहे. दुबळ्या आणि गोंधळलेल्या जीवांच्या हाती चुकीचे तत्वज्ञान म्हणजे माथेफिरूच्या हाती संहारक शस्त्र, त्याने भले होण्याऐवजी विनाश ठरलेला.

ह्रीदयपरीवर्तनाच्या वेड्या उन्मादात अवघे प्राणीमात्र नाहक जीवास मुकतील. त्यांची पिले, वासरे, बछडी, उघड्यावर पडतील. मालकाच्या दयेचे शिकार होतील. त्यांचे संगोपन, पालन पोषण कोण करेल. स्वातंत्र्य नाही, पण हकनाक हौतात्म्य मात्र पदरी येईल. भंपक बाजार बुणगी वृत्ती बळावेल. आधी सर्वंकष शक्तीची उपासना करा, स्वतःचे ह्रीदयपरीवर्तन करता येते का ते बघा, मग दुसऱ्याचे ह्रीदयपरीवर्तन करा.''

पाहुणा रागावला. आतल्या आत धुमसत, आपल्या पंखात नुकतेच फुटलेले एक लाल तांबडे पीस त्याने उपटून फेकून दिले.

''ठीक आहे, माझ्यावर तुमचा विश्वास नसेल तर पुढे सांगण्यात काही अर्थ नाही.''

असे म्हणून पाहुणा तडक खुराड्यात जाऊन, वाट पाहत थांबला.

अपेक्षेप्रमाणे क्षणातच तो राजबिंडा कोंबडा पाहुण्याच्या पाठीमागे धावला. त्याला परत चलण्यासाठी तो त्याची मनधरणी करू लागला. पाहुण्याने आपल्यावरील विश्वासाची खात्री करून घेतली आणि मगच तो सभेत परत आला.

तेंव्हा तो पाहुणा गरुडाला म्हणाला,'' मित्र, तू चुकतो आहेस. मालकाबद्दल अशी शत्रुभावना ठेवणे हाच आपला खरा शत्रू आहे.''

''ह्रीदयपरीवर्तन हे नव्या युगाचे नवे तंत्र आहे, नवा मंत्र आहे, नवी परिभाषा आहे. आता माझा प्रत्यक्ष अनुभव ऐका. मी जेथून आलो त्या शेतावर घडलेली गोष्ट आहे ही.

एक दिवस त्या शेतावरील मालकाने माझी एका कोंबड्या बरोबर झुंज लावून द्यायचे ठरवले. हा अन्याय होता माझ्यावर. तो सशक्त होता, मी अशक्त होतो. त्याला झुंजीचा अनुभव होता, तो आतापर्यंतची प्रत्येक झुंज जिंकला होता. मी प्रत्येक झुंज हरलो होतो.

मी ठरवले. मालकाला विनम्रतेने भाऊ म्हणून पुकारले आणि हा निर्णय बदलण्याची विनंती केली. त्याचे पाय धरले. त्याने झिडकारले. पण त्याला एक संधी देणे हे माझे कर्तव्यच होते. त्याची अधोगती बघून मला त्याची दयाच आली. त्याने ऐकले नाही. झुंज

सुरु झाली, पण मी मालकाचे ह्रीदयपरीवर्तन करायचा निश्चय केला होता. मी त्या प्रतिस्पर्धी कोंबड्याच्या प्रत्येक हल्ल्याला अप्रतीकाराने उत्तर दिले. माझी पिसे झडली. चोच मोडली. माझा शुभ्र तुरा माझ्याच रक्ताने लाल झाला. पण मी मागे हटलो नाही. सतत मार खात राहिलो. मालकाचा विश्वास बसेना म्हणून कि काय, मध्येच त्याने पण बुटाची एक सणसणीत लाथ मारली मला. पण मी त्याला बजावले, मी मार खात राहीन पण प्रतिकार करणार नाही. अविरत मार खाऊन मी दमलो, थंडगार, निपचित पडलो. त्या दुसऱ्या कोंबड्याला विजयी घोषित करण्यात आले. मालकाला वाटले, मी मेलो. ‘असा वेडा निरुपयोगी कोंबडा कधी पहिला नाही. जा, आजपासून तू मुक्त आहेस. ’ असे म्हणून त्याने मला चिमटीत पकडले आणि शेताच्या कुंपणाबाहेर फेकून दिले.

मी मालकाचे आभार मानले. त्या प्रतिस्पर्धी कोंबड्याचे ही आभार मानले. मी मालकाचे ह्रीदयपरीवर्तन केले होते आणि आता मी स्वतंत्र झालो होतो.

विजयापेक्षा पराभव, शक्तीपेक्षा शक्तीचा अभाव, प्रतीकारापेक्षा अप्रतिकार श्रेष्ठ आहे. अप्रतिकार हा आधिभौतिक समाधान देणारा असतो. हीन, दीन शक्तिहीन जीव नम्र असतात. दुर्बलांजवळ पराभव पचवण्याची अध्यात्मिक शक्ती असते.

तेंव्हापासून ह्रीदयपरीवर्तन हेच माझे साध्य आणि हेच माझे साधन आहे.''

परत एकदा सभेवर शांत दुर्बोध अवकळा पसरली. त्या संधीकालाचा फायदा घेत, तो तरुण राजबिंडा कोंबडा उठला, त्याने जोरात आवाहन केले आणि घोषणासुद्धा दिल्या.

''पाहुण्याचा विजय असो. तारणहार, पांढरा तुरा ह्यांचा विजय असो. पांढरा तुरा ही आता शांतीची स्मृती चिन्हीका झाली आहे. ज्या किमयागाराच्या आपण शोधात होतो ते आता आले आहेत. आपल्याला मुक्त करण्यासाठी. मालकाचे ह्रीदयपरीवर्तन करण्यासाठी. इन्किलाब झिंदाबाद. पांढरा तुरा ह्यांचा त्रिवार जयजयकार.

पुढच्या आठवड्यात ह्याच दिवशी ह्याच ठिकाणी परत भेटू. स्वातंत्र्य लढ्याची पुढची रूपरेषा आणि कार्यक्रम घेऊन. तोपर्यंत,

मार खा आणि मुक्त व्हा.

निर्भय व्हा आणि निष्क्रिय राहा.''

प्रश्नांना अनुत्तरीत करून सभा समाप्त झाली.

**********

लोकांना मूर्ख बनवण्यासाठी आधी स्वतः ठार मूर्ख असावे लागते. आणि पाहुणा नुसताच मूर्ख नव्हता तर उपयोगी मूर्ख होता. मालकाने त्याला बरोबर हेरले.

(अशा रीतीने शेतावर उपयोगी मुर्खांची परंपरा सुरु झाली आणि मालकाच्या प्रोत्साहनाने उत्तरोत्तर वाढतच राहिली.)

***********

एका आठवड्यात ह्रीदयपरीवर्तनाच्या क्रांतीची नांदी झाली. पाहुण्याच्या संमतीने त्या राजबिंडा कोंबड्याने एक नियमावली जारी केली, सर्व स्वातंत्र्य सैनिकांसाठी.

लगोलग मालक आणि मालकाच्या माणसाना एक सूचना बर हुकुम प्रसृत करण्यात आला.

"शेताचा मालक, त्याचा परिवार, नातेवाईक व नोकर चाकर, अशा सर्व माणसांनी हे शेत प्राण्यांच्या ताब्यात देऊन शेतावरून कायमचे निघून जावे. अन्यथा ह्रीदयपरीवर्तनाला तयार राहावे."

बऱ्याच प्राण्यांना ह्या सूचनेचा अर्थच समजला नाही. काहींनी ह्याला पोरकट बाश्कळ बाजी म्हणून हिणवले. काहींनी त्यामध्ये नवीन नेतागीरीची लक्षणे पहिली. पण बहुतेक प्राण्यांनी ह्या सूचनेचे जोरदार समर्थन केले. कारण मालकाला 'चले जाव' सांगणारा आणि त्याला ह्रीदयपरीवर्तनाची धमकी देणारा कोणीतरी महान

असला पाहिजे आणि आता २ – ३ दिवसात आपण शेताचे मालक होणार, स्वतंत्र होणार ह्या स्वप्नाने ते उत्तेजित झाले. त्यांचा उत्साह कायम ठेवण्यासाठी मग त्याच घोषणेची एक टूम काढण्यात आली. ‘चले जाव. ’ फारच सुंदर, छोटीशी, सुटसुटीत घोषणा. बोलायला अतिशय सोपी. नेमका अर्थ सांगणारी. सशाने स्वतःशीच ती घोषणा देऊन बघितली. त्याला फारच मोकळे, मोकळे वाटले. गुलामीचे ओझे उतरवून हलके झाल्यासारखे वाटले. गाढवाने ती घोषणा जोरात, मोठ्या आवाजात म्हटली. जवळचा नोकर एकदम दचकलाच. गायीला तर आनंदाचे अश्रू आवरेना. पण तिनेही रडत रडत घोषणा दिली. ‘चले जाव. ’ वासराला फारच मजा वाटली. त्याने आजूबाजूच्या सगळया पिल्लांना एकत्र केले. मग त्या सर्वांनी आपले चारी पाय चार दिशेला झाडत, आरडत, ओरडत, घोषणा देत गोठ्याला, खुराड्याना, शेतातल्या धान्याच्या खळयाला एक चक्कर मारली. तो कोलाहल ऐकून शिंगरू तबेल्या बाहेर आले आणि त्याने घोड्याला ही खेचत बाहेर आणले. घोड्याने तो सुचानाबर हुकुम वाचला. परत वाचला. मग तो शहाण्या जुन्या जाणत्या अ. ज्ञा. नी. घुबडाकडे गेला. घुबडाची आणि पाहुण्याची आधीच चिंतन बैठक झालेली होती. त्यामुळे त्याने एकदा मान इकडे आणि एकदा तिकडे केली आणि संथ, कंटाळवाण्या सुरात

जसे ज्ञानी लोक बोलतात तसे बोलायला सुरवात केली. हळू हळू सगळे प्राणी जमा होऊन ऐकू लागले.

“मित्र प्राणी जनहो,

चले जाव ही ह्रीदयपरीवर्तनाच्या लढ्यातील पहिली पायरी आहे. ह्रीदयपरीवर्तनाच्या तंत्रामध्ये अचानक, बेसावधपणे शत्रूवर हल्ला करता येत नाही. त्याला खंबीरपणे पूर्व सूचना देऊन मग त्याचे ह्रीदयपरीवर्तन करावे लागते. सूचनेचा अभाव ही ह्या तंत्रातली एक त्रुटी मानली जाते. तेंव्हा ही सूचना देऊन आपण लढ्याला तोंड फोडले आहे. त्यागाला तयार राहा. मरायला आणि मार खायला तयार राहा. प्रतिज्ञा करा –

‘हे शरीर शतशः विदीर्ण झाले तरी प्रतिकार करणार नाही. मरता, मरता मरेस्तोवर मार खाईन, आणि समजा स्वातंत्र्य नाही मिळाले, तर मरून हौतात्म्य पत्करेन. ’”

घुबडाने डोळे उघडले. पण समोर एकही प्राणी दिसेना. त्याने मग चेतक घोड्याला हाक मारली. बोलावूनच घेतले कसे आणि ती प्रतिज्ञा त्याच्याकडून वदवून घेतली.

आता हा सूचनाबर हुकुम मालकाला सांगायचा कोणी असा प्रश्न पडला. कोणीच तयार होईना. राजबिंडा तरुण कोंबडा

अचानक दिसेनासा झाला. पांढरा तुरा तर नदीकाठी बगळ्याच्या शेजारी ध्यान लावून बसला. कोंबडे कोणीही खुराड्याच्या बाहेर येईना. गायीचा चिरका आवाज आणि डुकराचा घोगरा आवाज अयोग्य होता अशा कामासाठी. शेळ्या, बकऱ्या आणि मेंढ्या ह्यानाही त्याच कारणासाठी नाकारण्यात आले. निरोप्या कसा निश्चयी, प्रभावी, छाप पडणारा, आणि खणखणीत आवाज असलेला पाहिजे होता. शेवटी ही कामगिरी चेतकवर सोपवण्यात आली. त्याने ती आनंदाने स्वीकारली.

चेतक मालकाच्या निवास स्थानी लोखंडी दरवाज्यापाशी गेला. पण त्याला आत कोणी सोडेना. मालकाच्या माणसांबरोबर त्याची थोडी हातापायी झाली. काय झाले ते बघण्यासाठी मालक बाहेर आला. ती संधी साधून चेतकने प्राण्यांचा निरोप जोरात मालकाला ऐकवला. झाडाआडून सगळे प्राणी बघत होते. त्यांना चेतकचा मोठा अभिमान वाटला. निरोप ऐकताच मालक भयंकर चिडला आणि त्याने चेतकवर नळीतून आवाज टाकला. चेतक सावध होता तरी त्याला गोळी चाटून गेली. मालकाच्या नोकराचा दंडुक्याचा सुद्धा निसटसा घाव बसला. पण क्षणात त्याने आपल्या पुढच्या पायांनी मालकाला दूर उडवले, नोकराला खाली पाडले. मालक जवळच्या फणसाच्या झाडावर आपटला आणि बेशुद्ध

झाला. नोकराच्या छातीवर चेतकने पायाने जी जोरदार लाथ मारली त्याने तो तिथेच मेला. बाजूचे नोकर धावले. त्यांनी चहु बाजूनी चेतकवर आवाज टाकले. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. चेतक दोनदा पाय झाडून रक्ताच्या थारोळ्यात आडवा झाला. कायमचा. घाबरलेले प्राणी मागच्या मागे पळाले. मालकही जबर जखमी झाला. त्याच्या माणसाना काय झाले हे कळले तेंव्हा ते आश्चर्य चकित झाले. घाबरले. चिडले. काहीजण नळ्या सावरत, राखणदार कुत्र्यांना घेऊन शेतामधून फिरू लागले आणि दिसेल त्या प्राण्याला ठार मारू लागले.

त्या निरोपाचा नेमका अर्थ आणि प्रत्यक्ष मालकावर हल्ला करण्याचे धाडस, ह्यातील गांभीर्याने मालकाचा मुलगा हादरला.

प्राणी प्रथम घाबरले, पण मालक जायबंदी झाला हे ऐकून त्यांना आनंद झाला. चेतकच्या धडाडीचे आणि शौर्याचे सर्वजण कौतुक करू लागले. त्याच्या मृत्यूमुळे एक उमदा, शक्तिवान प्राणी आपण गमावला ह्याचे त्यांना दुःख झाले.

पांढऱ्या तुऱ्याला जेंव्हा सर्व कळले, तेंव्हा त्याने तरुण, राजबिंडा कोंबड्याला बोलावून घेतले आणि आपला संदेश सर्व प्राण्यांपर्यंत पोहोचवण्यास सांगितले. संदेश असा होता.

‘‘मित्र प्राणी जनहो,

चेतकने मालकावर जो भ्याड हल्ला केला, त्याचा आपण सर्व प्राणी आणि मी, निषेध करत आहोत. त्याने ह्रीदयपरीवर्तनाच्या मोहिमेला सुरवातीसच एक कलंक लागला आहे. तो कलंक धुवून निघण्यासाठी मी संपूर्ण अर्धा दिवस उपोषण व मौन धारण करून आत्मपरीक्षण करणार आहे. बाकी प्राणीमात्रानी सुद्धा आत्मपरीक्षण करावे. मालक लवकरात लवकर बरा व्हावा अशी आपण आशा आणि प्रार्थना करू या.

आपला सेवक,

पांढरा तुरा कोंबडा."

पांढऱ्या तुऱ्याचा हा संदेश ऐकून प्राण्यांना धक्काच बसला आणि ते पार गोंधळून गेले. त्या धक्क्यातून ते सावरतात, न सावरतात तोच खारीने सगळयांचे लक्ष वेधले आणि झाडावर लटकवलेली एक मोठी पाटी दाखवली. सगळेजण त्या पाटीभोवती गोळा झाले. मग खारीने त्या पाटीचे सामुदायिक वाचन केले ते असे.

मरणारे आणि मार खाणारे अशा हुतात्म्यांसाठी ह्रिदय परिवर्तनाची नियमावली

१. हुतात्म्याने मारणाऱ्याचे मन मोडू नये, तो देईल तो, तसा आणि तेव्हढा मार आनंदाने खावा. त्याची अशा रीतीने एकतरी इच्छा पुरी करावी.

२. हुतात्म्यांपैकी जे श्रेष्ठ, बलिष्ठ किंवा वरिष्ठ असतील त्यांनी स्वतःची शक्ती, बुद्धी आणि कर्तृत्व तुच्छ समजावे.

३. हुतात्म्याने स्वतःची, स्वतःच्या जातीची व स्वतःच्या जाती बांधवांची निंदा करावी.

४. हुतात्म्याने मारणाऱ्याचे पाय पाहावेत, डोळ्यात पाहू नये, जेणेकरून मारणाऱ्या बद्दल आपल्या मनात अप्रीती निर्माण होणार नाही.

५. ह्रिदय परिवर्तनाचे तंत्र ज्यांनी शोधले त्या पांढरा तुरा – महान आत्मा, ह्यांच्याविषयी नेहमी श्रद्धा बाळगावी. श्रद्धा म्हटले कि परत डोळस आणि अंध असा विचार उरत नाही. एकतर श्रद्धा आहे किंवा श्रद्धा नाही, त्याला कार्य – कारण भाव नसतो.

६. कणखर मनाने, मरणारे आणि मार खाणारे हुतात्मे, नेत्याला प्रिय होत.

७. आत्मविश्वास, आत्मगौरव, स्वाभिमान ह्या गोष्टींपासून हुतात्म्याने दूर राहावे. त्यामुळे अहंकार बळावतो. असा आत्म केंद्रित जीव ह्दिय परिवर्तानातील लढ्यासाठी योग्य नाही, तो मारणाऱ्याला धोका पोहोचवू शकतो.

८. हुतात्म्याने स्वतःला टाकावू व निरुपयोगी समजावे, म्हणजे मारणाऱ्याचा हात मारताना थरथरणार नाही.

९. हुतात्म्याने कधीही कोणत्याही शक्तीची उपासना करू नये. अपवादात्मक फक्त एकाच शक्तीची जोपासना आणि संवर्धन करावे, ती म्हणजे सहन शक्ती.

१०.     सर्व प्राण्यांनी आपापसात प्रेम बाळगावे, जंगली लांडगे आपले भाऊ आहेत तेंव्हा त्यांना नेहमी सांभाळून घ्यावे, मार खाताना पांढऱ्या तुऱ्याचा त्रिवार जय जयकार करावा.

११.     सर्व प्राण्यांनी रोज सकाळ, संध्याकाळ मालकाचे, त्याच्या माणसांचे, महान आत्मा पांढरा तुरा ह्यांचे अभिष्ट चिंतन करावे.

ह्दिय परिवर्तनाच्या धर्म युद्धातील ही एकोदश सूत्रे सर्व शेतावर, सर्व प्राण्यांना, सर्व माणसाना समजावून देण्याचे महत्वाचे काम अ. ज्ञा. नी. घुबडांवर सोपवण्यात आले.

अशा रीतीने मालकाच्या ह्दिय परिवर्तनाची नांदी झाली आणि लढा सुरु झाला.

*********

आता महान आत्मा – पांढरा तुरा सर्वदूर शेतावर भाषणे देत, ह्दिय परिवर्तनाविषयी माहिती देत, प्राण्यांना जागरूक करू लागला. शेतावर सगळीकडे प्राण्यांनी एकत्र येऊन मोर्चे काढले. घोषणा दिल्या. आंदोलने केली. उस्फुर्तपणे प्रभात फेऱ्या निघाल्या.

ठीक ठिकाणी सभा घेतल्या. सर्व प्राण्यांचा आता निश्चय झाला होता.''मालक नको.''"अन्याय सहन करायचा नाही." उपोषणे आणि मौन हे परवलीचे शब्द झाले. महान आत्मा पांढरा तुरा ह्यांच्या नेतृत्वाखाली शेताच्या चारी कोपऱ्यातून उठाव झाला. निरनिराळ्या ठिकाणी शेतावर सत्याग्रह झाले. उत्साह भरपूर. जोश आणि जल्लोष उतू जाणारा. पण सुस्पष्ट व एकसंध विचारांची आणि नियंत्रणाची कमतरता होती. ती झाकण्यात आली एका घोषणेखाली -

"सगळ्यांना सगळे मिळणारच आहे ह्रिदय परिवर्तनानंतर."

हे घोष वाक्य बनले. प्राण्यांच्या आशांचा ताईत झाले, मार सगळ्यांनी भरपूर खाल्ला. पण अंधुक प्रकाशात चाचपडणे काही थांबले नाही. अनागोंदी आणि अनास्था ह्यामुळे शेताला एखाद्या पडीक उजाड माळ रानाचे रूप आले. कोल्हे, लांडगे, शिकारी कुत्रे, शिरजोर झाले. कोंबड्यांचा मान वाढला. मार खाण्याचा गुण ज्यांच्यामध्ये नव्हता ते प्राणी जसे घोडा, खेचरे, राखणदार कुत्रे मागे पडले. भोंगळपणा वाढला. मालक जेंव्हा मार देईल तेंव्हाच तो खायचा असल्याकारणाने इतर वेळी लढ्याचे काही काम उरले नाही. प्राणी आळसावले, सुस्तावले. नेत्यावर आणि त्यांचा शत्रू मालकावर सर्व काही सोपवून निर्ढावले, झोपा काढू लागले.

आंधळा स्वार्थ साथीच्या रोगासारखा फैलावला. त्याने शेताला अपंग केले. आंदोलनच्या गर्दीतही छुपा स्वार्थ कधी घुसला आणि त्याने आंदोलनाचा ताबा कधी घेतला ते कळले नाही. आंदोलक आणि आंदोलन ह्याची फारकत झाली. मालकाने त्याचा वेळोवेळी फायदा उठवला. गरुडाने प्राण्यांना सावध करायचा प्रयत्न केला. पण प्राण्यांची दूरवरची नजर गरुडाएव्हढी तीक्ष्ण नव्हती. गरुड एकटा पडला. कोंबड्याना तर उडताच येत नव्हते, त्यात त्यांचा दोष नव्हता. पाण्याचा लोंढा जशी वाट मिळेल तसा, हजारो वाटांनी, स्वातंत्र्याच्या दिशेने पुढे जात राहिला.

प्राण्यांना आकाशाची ओढ होती. पण डबक्यातल्या आकाशाच्या प्रतीबिम्बालाच ते आकाश समजत होते. गरुडाबरोबर उंच भरारी घेऊन आकाशाला प्रत्यक्ष भेटण्याची शक्ती त्यांच्यात नव्हती. म्हणून महान आत्मा पांढरा तुरा ह्यांनी दाखवलेल्या डबक्यातल्या आकाशाच्या तुकड्याला त्यांनी कवटाळले, आकाश म्हणून. मग अशी असंख्य डबकी तयार झाली – आकाश दाखवणारी. डबक्यातल्या आकाशात झेप घेण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांचा कपाळ मोक्ष झाला. फक्त ते त्याला हौतात्म्य म्हणत राहिले. परिस्थिती बदलली नाही. उपासमार,

मालकाचा जुलूम, जंगली लांडग्यांचे हल्ले, आणि आपापसातल्या वैराचे बळी झाले प्राणी. बळी जात राहिले.

जिकडे तिकडे प्राणीमात्रांचे पाहुण्याच्या स्वागतासाठी, त्याच्या खाण्या पिण्याच्या विशिष्ट मागण्या पूर्ण करण्यात कंबरडे मोडले. नवीन नेते उदयास आले. नवीन पाहुणे उदयास आले. प्रत्येकाच्या स्वागताच्या मागण्या वेगळया वेगळया. प्राणीमात्र दमले पाहुण्यांना खुश करण्यात. पण सांगणार कोणाला. त्यानीच त्यांच्या स्वातंत्र्याच्या पूर्तते साठी हे दलाल नेमले होते. दलाल नंतर हलालाना जाऊन मिळाले. प्राणी फक्त बघत राहिले.

********

महान आत्मा पांढरा तुरा आणि राजबिंडा कोंबड्याने गरुडाचा आदेश आणि उपदेश धुद्कारून क्रांतीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

## जाहीरनामा

| | |
|---|---|
| आमचा झेंडा | पांढरे निशाण |
| आमचे ध्येय | शत्रूचे ह्रिदय परिवर्तन |

| | |
|---|---|
| आमचा नेता | श्री. किमयागार / श्री. तारणहार |
| आमचे वाक्य | मार खा, आणि मुक्त व्हा.<br>निर्भय व्हा आणि निष्क्रिय राहा. |
| आमचे तत्वज्ञान | दुर्बलाला सबळ, सबळाला समंजस, समंजसाला सुशिक्षित, सुशिक्षिताला सक्रीय करणे म्हणजे क्रांती. |
| आमची कार्य पद्धती | दुर्बलाला सबळ – अप्रतीकार,<br>सबळाला समंजस – प्रार्थना,<br>समंजसाला सुशिक्षित – उपोषण आणि आत्मक्लेश, सुशिक्षिताला सक्रीय - धरणे आणि मोर्चा. |
| आमचे वचन | शत्रू असला तरी, स्वातंत्र्य हा त्याचा जन्म सिद्ध हक्क आहे आणि माझ्या स्वातंत्र्यासाठी मी त्याच्या हक्काला बाधा आणणार नाही. |

| आमची स्मृती चिन्हीका | पांढरा तुरा |
| --- | --- |
| आम्ही शेतावरील सर्व प्राणी मिळून हा जाहीरनामा प्रसिद्ध केला असे. | |

गरुडाला अपेक्षित होती ती क्रांती घडली नाही. त्याचे तत्वज्ञान आणि कार्य पद्धती नाकारण्यात आली. दुर्बलाला सबळ करण्यासाठी – शक्तीची उपासना, सबळाला समंजस करण्यासाठी – त्या उपासनेतून येणारा आत्मविश्वास, समंजसाला सुशिक्षित करण्यासाठी – त्या आत्मविश्वासावर आधारित प्रेम आणि जिज्ञासा, आणि सुशिक्षिताला सक्रीय करण्यासाठी – त्या प्रेमातून पुढे केलेला मदतीचा आणि मैत्रीचा हात ; ह्या सनातन विचारांना सोडून देण्यात आले. त्यामुळे शेतावरल्या प्राण्यांना नक्की काय करायचे हे कळले नाही, ठरवता आले नाही आणि गोंधळ माजला.

***********

ह्दिय परिवर्तनाच्या क्रांतीची सुरुवात तर धडाक्यात झाली.

पण शेतावर महान आत्मा पांढरा तुरा ह्यांचे आगमन झाल्यापासून प्राण्याना कधी कधी फार विचित्र प्रसंगातून जावे लागले.

एक दिवशी बातमी आली कि दक्षिणेकडे एका लांडग्याने आमरण उपोषण चालू केले आहे. तो एक कृश, दुबळा, म्हातारा लांडगा होता. तो लांडगा होता, राजबिंडा कोंबड्याचा मित्र होता, तेंव्हा क्रांतीचा सच्चा अनुयायी होण्यासाठी आणखी काय पाहिजे होते. तेंव्हा त्याच्या उपोषणाला गंभीर स्वरूप प्राप्त झाले.

उपोषणाचे कारण आणि प्रमुख मागणी होती 'सशाची'. त्याला रोज एक ससा पाहिजे होता. तो म्हातारा व दुबळा असल्याने त्याला उपासमार होऊ लागली होती. तेव्हा त्याचा जीवन मरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी त्याला ससा पाहिजे होता आणि त्यासाठी तो उपोषणाला बसला होता.

पण कोणत्याही सशाचे ह्रिदय परिवर्तन होत नव्हते.

तीन दिवसांनी महान आत्मा पांढरा तुरा ह्यांचा दूत म्हाताऱ्या लांडग्याला भेटायला आला. त्याने त्याच्या तब्बेतीची विचारपूस केली आणि महात्म्याला सर्व वृतांत पोहोचवण्याची जबाबदारी घेतली. सशांची भेट घ्यायचे काही कारण वाटले नाही त्याला. सशांमुळे, त्यांच्या आडमुठ्या स्वभावामुळे, तर प्रश्न निर्माण झाला होता.

उपोषणाला सहा दिवस झाले, काही तोडगा निघाला नाही.

लांडगे खवळले.

ससे घाबरले, बावरले. मग त्यांनी पण एक सामुहिक उपोषण सुरु केले. त्यांची मागणी होती, त्यांना लांडग्यांच्या हिंसाचारापासून आणि हल्ल्यांपासून संरक्षण मिळावे. ताबडतोब महात्म्याचा निरोप आला कि उपोषणा विरुद्ध उपोषण हे नियमावलीत बसत नाही. तेंव्हा सशांना त्यांचे उपोषण मागे घ्यावे लागले.

एक दिवस आणखी असाच गेला.

म्हातारा लांडगा उपोषण सहन न झाल्याने मेला.

तसे शेतावर लांडग्यांनी धुमाकूळ घातला. मृत्यूचे थैमान सुरु केले. ससे, शेळ्या, मेंढ्या, बकऱ्या, डुकरे, गायी म्हशी, वासरे, पिल्ले, ह्यांच्यावर कळपाने हल्ले केले. गोठ्यात आत घुसून हल्ले केले. जिकडे तिकडे हाहाकार माजला. प्राणी हीन दिन होऊन महात्म्याकडे गेले. महात्म्याने परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी अ. ज्ञा. नी. घुबडाची तटस्थ निरीक्षक म्हणून नेमणूक केली आणि सशांना शांततेचे आवाहन केले.

अ. ज्ञा. नी. घुबडाने एक दिवस निरीक्षणात घालवला. लांडग्याशी सविस्तर बोलणी केली. त्यांचा प्रश्न समजावून घेतला.

ससे आणि छोटे प्राणी ह्यांनी घुबडाच्या नेमणुकीवर आक्षेप घेतला, कारण लांडग्यांनी जी क्रूर कत्तल केली ती दिवसा ढवळ्या, कळपाने येऊन केली होती. ती घुबडाने बघितलीच नव्हती.

महान आत्मा पांढरा तुरा आणि अ. ज्ञा. नी. घुबड ह्यांनी मग एक दिवस चिंतन बैठक घेतली सर्व कोंबड्यांची आणि निवाडा दिला तो असा.

१. ससे गवत खातात. लांडगे सशांना खातात. तेंव्हा लांडग्यांनी परस्पर गवत खावे.

२. सशांनी आत्म बलिदान करून लांडग्याचे ह्रिदय परिवर्तन करावे.

ससे आणि लांडगे दोघांना ह्यातील कोणताही पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य होते.

महान आत्मा पांढरा तुरा आणि राजबिंडा तरुण कोंबडा, ह्यांच्याकडून सशांना ह्रिदय परिवर्तनाच्या लढ्यातील त्यांच्यावरील जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली.

अशा रीतीने महान आत्मा पांढरा तुरा ह्याने प्राण्यांना कठीण पेच प्रसंगातून सोडवले.

*********

तेंव्हा गरुड महान आत्मा - पांढरा तुरा ह्याला, पाहुण्या कोंबड्याला म्हणाला.

“जे झाले ते फार वाईट झाले. दक्षिणेस लांडग्यांनी अशी सर सकट कत्तल केली आणि आपण शेतावरचे बाकीचे प्राणी त्यांना वाचवू शकलो नाही, त्यांच्या मदतीला गेलो नाही. असे परत होता कामा नये.

नेत्याला अनुयायाची ओळख नाही, अनुयायाना नेत्याचा आदर वजा धाक नाही. बोलणे आदर्शवादी, आचरण चुकत माकत कधीतरी आदर्शवादी, ठोस प्रगती नाही, आणि चुका त्याच त्याच पुन्हा पुन्हा, होत असतील तर त्या नेत्याने काय करावे असे आपणास वाटते.

दुर्बलाला सबल, सबलाला समंजस, समंजसाला सुशिक्षित आणि सुशिक्षिताला सक्रीय करणे हा क्रांतीचा मार्ग आहे. दुर्बलाला ह्रिदय परिवर्तन करायला सांगितल्याने फक्त गिधाडांची सोय होईल. शेवटी एक वेळ अशी येईल कि तुम्हाला बाजूला करून गिधाडे आणि लांडगे शेताचे मालक होतील. तेंव्हा मालक बरा होता असे म्हणायची वेळ येईल तुमच्यावर. असत्याचा मार्ग सोडा. आत्म विनाशाचा मार्ग सोडा. सावधान राहा.”

महान आत्मा पांढरा तुरा ह्यांनी लगेच आत्म शुद्धीसाठी एका उपोषणाची घोषणा केली. तरुण राजबिंडा कोंबड्याने आत्म

चिंतनासाठी लांडगे आणि सशांचा एकत्र एक मोर्चा काढण्याची घोषणा केली.

मग नेहमीप्रमाणे त्रिवार जयजयकारात सगळे काही आटपण्यात आले.

*********

दर वर्षी क्रेन पक्ष्यांचे थवे नदीच्या पात्राच्या बाजूला असलेल्या सखल, दलदल प्रदेशात येत. त्यांच्या बरोबर दूर दूरच्या देशोदेशीच्या बातम्या शेतावर येत. सर्व प्राण्यांना ह्या देखण्या, मनोहर मित्रांच्या आगमनाची मोठी हुरहूर वाटत असे. आधी येणार म्हणून आणि नंतर जाणार म्हणून.

त्यांच्या बरोबर एक विचित्र बातमी शेतावर आली. पसरली. ती ऐकून प्राणी आश्चर्याने उत्तेजित झाले. क्रेन पक्ष्यांच्या वाटेवरील काही देशात म्हणे, मनुष्य प्राणी पिसाळले आहेत, एकमेकांवर हल्ले करून, एकमेकांना ठार मारत आहेत. जर एक मनुष्य प्राणी दुसऱ्याला मारून खात नाही, तर तो एकमेकाना का ठार मारत आहे, हे कोडे शेतावरच्या प्राण्यांना उलगडले नाही.

ही बातमी महात्म्याला कळली तेंव्हा तो अस्वस्थ झाला. त्याने तरुण राजबिंडा कोंबड्याला सर्व प्राण्यांना सभेसाठी एकत्र

करण्यास सांगितले. सगळे प्राणी जमले. मालकाच्या शिकारी कुत्र्यांनी सुद्धा कुंपणावरून कान टवकारले.

“मित्र, प्राणी जनहो,

मनुष्य प्राणी चुकतो आहे. त्याला आपण मदत केली पाहिजे. त्याला ह्रिदय परिवर्तनाच्या मार्गावर आणले पाहिजे. आपण त्याला आवाहन करू या.

हिंसाचाराचा त्याग करून ह्रिदय परिवर्तनाची कास धरा. आपल्या जवळच्या सुंदर, मौल्यवान वस्तू, धन धान्य, पैसा अडका, घर दार, जमीन जुमला, मालमत्ता, सर्व गोष्टी देऊन शत्रूचे मन जिंकावे. जरूर तर स्वतःचा प्राणही देऊन त्याचे ह्रिदय परिवर्तन करावे.

आपला, आपल्या देशाचा वृथा अभिमान बाळगू नये, तो ह्रिदय परिवर्तनाच्या आड येत असतो. शौर्य आणि वीरश्री क्षणिक आहेत, निष्क्रियता आणि औदासिन्य कालौघात टिकणारे आहेत. शिवाय त्यात अभय आहे, रस्ता कधीही न चुकण्याची खात्री आहे.

तेंव्हा मार खा, अप्रतीकाराने मरा, पराभव पत्करून शत्रूचे मन जिंका.

एकदा ह्रिदय परिवर्तन झाले कि सगळ्यांना सगळे मिळणारच आहे.”

त्रिवार जयजयकारात ठराव संमत करून दूर देशीच्या माणसाना पाठवण्यात आला.

त्या दूरच्या शेताच्या मालकाचे लगेच उत्तर आले.

“महान आत्मा पांढरा तुरा ह्यांना अभिवादन.

इथे शत्रूच्या ह्रिदय परिवर्तनासाठी तुमची खूप गरज आहे. तुम्ही स्वतः इथे येऊन ह्रिदय परिवर्तनाचे प्रात्यक्षिक दाखवावे ही विनंती.

तसेच जेव्हढ्या जमतील तेव्हढ्या शेळया, मेंढ्या, बकऱ्या, कोंबड्या, डुकरे अशा प्राण्यांना इकडे पाठवावे. ते शत्रूचे ह्रिदय परिवर्तन करतील. उन्नतीची अशी संधी सोडू नये. इहलोकीची चिंता करू नये, परलोकाची आस्था धरावी. मग कधी येताय?

आपला शुभ चिंतक,

मालकवर्ग.”

कोणीही प्राणी त्या दूर देशीच्या शत्रूचे ह्रिदय परिवर्तन करायला, जायला तयार झाला नाही. आपले शेत सोडून तिकडे जायला महात्मा आणि राजबिंडा कोंबडा ह्यांना वेळ नव्हता. त्यामुळे ते प्रात्यक्षिकाचे तसेच राहिले आणि तो विषय तिथेच संपला.

**********

पण उपासमार आणि मालकाच्या जाचाला कंटाळून, राखणदार कुत्रे खूप मोठ्या संख्येने त्या दूरदेशी निघून गेले. निघण्यापूर्वी त्या संध्याकाळी गरुडाने त्यांना एकत्र बोलावले आणि सांगितले.

“माझ्या बहादूर मित्रानो,

तुमचे अभिनंदन. तुमच्या धाडसाचे आणि शक्तीचे कौतुक करावे तेव्हढे थोडेच आहे. पराक्रम करा. शौर्य दाखवा. आणि परत येताना आपल्या प्राणी जणांच्या सुटकेची परीपूर्ण योजना तयार करून आणा.

आपल्या शेताला विसरू नका. आपली माती इथेच मिसळणार आहे. धीराने राहा आणि जिंकून परत या.”

महान आत्मा पांढरा तुरा ह्याला हे फारसे आवडले नाही. पण राखणदार कुत्र्यांनी त्याला कधीच नेता मानले नव्हते. म्हणून ते निर्धाराने निघून गेले.

मालकाचा मुलगा अस्वस्थ झाला त्यांच्या अशा मोठ्या प्रमाणावर निघून जाण्याने, कारण त्याची शेतावरची पकड तेव्हढी ढिली झाली.

**********

शेतावर सगळीकडे सर्वच प्राण्यांची अशी केविलवाणी स्थिती नव्हती. खूप ठिकाणी काजवे, मिट्ट अंधारातही लुकलुकत होते. प्रकाशत होते.

नदीच्या काठी जिथे धक्का होता तिथे छोट्या मोठ्या बोटींची सारखी ये जा चालू असे. मालाची ने आण, उतार चढाव होई. हमाल, खलाशी, व्यापारी, मालकाचे नोकर चाकर, हौशे गवशे नवशे आणि बघे, नुसती जत्रा असे रोज. त्या बरोबरच बैलगाड्या, उंट गाढवे खेचरे रेडे ह्यांनी ओढणाऱ्या गाड्या, हात गाड्या, घोडा गाडी, बग्गी, पालखी, सगळ्यांची धावपळ, लगबग, चाल ढकल. वातावरण कसे जिवंत आणि चैतन्याने भरलेले असे सदा. त्यामुळे तिथले प्राणी सुद्धा जास्त जागरूक, मेहनती, कार्यशील होते. प्रत्येकजण कामाशी जोडलेला. कोण कोणाची उगाच अरेरावी खाली मान घालून खपवून घेणार नाही. ठरलेल्या वेळी ठरलेले खाणे पुढ्यात आले नाही तर प्राणी काम पुढे रेटत नसत. मग मालकाच्या माणसां बरोबर हातापायी सुद्धा होत असे. मालक / त्याची माणसे, प्राणी आणि काम ह्यांचे एक त्रिकुट होते एकमेकाला बांधलेले. जरूर मालकालाही होती, सर्व माल वेळच्या वेळी पाठवण्याची.

ह्रिदय परिवर्तनाने इथे म्हणावा तसा जोर धरला नव्हता. महान आत्मा पांढरा तुरा आणि राजबिंडा कोंबडा ह्यांच्या बद्दल काही बाही, उलट सुलट ऐकले होते प्राण्यांनी. पण जो तो कामाला जुंपलेला, ह्रिदय परिवर्तनाची चैन करायला कोणापाशी वेळच नव्हता.

पण तो दिवस कायम लक्षात राहील.

सकाळपासून कामाच्या प्रचंड ओझ्याखाली चेतक दबून गेला होता. गाडीतले ओझे नेहमीपेक्षा जास्त होते. आणि ते वेगाने कोठेतरी हलवायचे होते. त्यामुळे मालकाच्या नोकराचा चाबूक सारखा कडाडत होता. तोंडाला फेस आला होता आणि सकाळपासून खाणे पिणे काही मिळाले नव्हते. तीन फेऱ्या झाल्या तरी लगेचच, उसंत न देता नोकराने चवथ्या फेरीला जुंपले.

चार फेऱ्या झाल्या, उन्ह डोक्यावर आली तरी विश्रांती साठी न तो थांबेना, न खाण्या पिण्यासाठी थांबेना. पाचव्या फेरीला चेतक खालीच बसला. त्याला उठवेनाच. नोकराने चाबकाचे किती फटके मारले तरी त्याला उठवेनाच. नोकराने मालकाच्या मुलाकडे तक्रार केली. मालकाचा मुलगा सतत कावलेला, सगळ्यांवर आणि जगावर कायमचा चिडलेला. पक्का माथेफिरू. नोकराने तक्रार करताच त्याने तिरमिरीत खांद्यावरची नळी काढली व काही विचार

न करता चेतकला गोळी घातली. श्रमाने अर्धमेला झालेला चेतक जागच्या जागीच मेला.

चेतकला गोळी घातली ही बातमी धक्क्यावर सर्व प्राण्यांना समजली. ते पिसाळले. मालकाच्या कामात जुंपलेले सगळे प्राणी काम टाकून चेतकला बघायला आले. धक्क्यावरचे काम थांबले. ते बघून मालकाचा मुलगा आणखी चिडला, रागाने बेभान होऊन त्याने एका खेचराला व एका कुत्र्याला गोळी घातली.

प्राण्यांची सहनशक्ती संपली. काम टाकून ते दूर पळून गेले.

चेतकचा मित्र समशेर पेटून उठला अन्यायाने आणि त्याने रात्रीच सगळ्या प्राण्यांची सभा बोलावली. समशेर, सर्जा, चिन्या, बिजली, माणिक, असे शक्तिमान आणि वेगवान घोडे आले. गाढवे आणि कुत्रे आले. उंदीर, मांजर व चिचुंद्री आले. बैल, रेडे आले. शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी, बकऱ्या, आले. कोंबड्या आल्या. घुबड आले. सगळे आले.

समशेर म्हणाला,"आता हा अन्याय सहन होणे नाही. ह्याला उत्तर दिले पाहिजे. बोला, तुमचा काय विचार आहे. पटत असेल तर प्रत्येकाने स्वतःला काय करता येईल आणि कोणती जबाबदारी पेलता येईल ते सांगावे."

सर्व प्रथम उंदीर बोलले.''समयीच्या, पणतीच्या, मशालीच्या ज्योती पळविण्यात आमच्यासारखे हुशार कोणीच नाही. आम्ही सगळीकडच्या ज्योती पळवून निरनिराळया कोठारांमध्ये टाकून आगी लावून देऊ शकतो. सगळया नौका व बोटी, आगीत जळून जातील. मालकाचा माल नदीपलीकडे जाऊच शकणार नाही.''

समशेर म्हणाला,''मालक आणि त्याचे नोकर आगी विझवतील पाण्याने, मग नौका आणि बोटी वाचतील. शिवाय ते नळया मधून हल्ले करतील आपल्यावर.''

तेंव्हा बैल आणि रेडे एकदमच म्हणाले,''आम्ही पाणी उपसणार नाही.''

मग मांजरांनी गलका करून सांगितले.''आम्ही सर्व कोठारात फिरत असतो. तेंव्हा तिथल्या फळयांवर ठेवलेले चिकट द्रावणाचे डबे खाली लोटून देऊ. त्याने ते चिकट द्रव खाली ठेवलेल्या नळयांवर पडून त्या कूच कामी होतील. त्याने मालक किंवा त्याचे नोकर आपल्यावर नळयांमधून हल्ला करू शकणार नाहीत.''

त्यांचा उत्साह बघून सगळे घोडे, खेचरे, गाढवे आणि कुत्रे एकत्र आले आणि म्हणाले,''आम्ही मालक आणि त्याच्या नोकरांवर सरळ, सरळ, समोर दिसताच हल्ले करू आणि त्यांना

पळवून लावू. त्यांच्या घराबाहेर, रस्त्यावर, बागांमध्ये, कोठारांच्या बाहेर जमून त्यांना बाहेर पडणे अशक्य करू.''

समशेर मग बाकीच्या प्राण्यांना म्हणाला,''तुम्ही रस्त्यावर ठीक ठिकाणी जमून भरपूर आरडा ओरडा करा. त्याने ते घाबरतील आणि आपल्यावर हल्ला करायचा विचार सोडून देतील. तुमचा सगळयांचा एकत्रित आवाज ऐकून त्यांना आपल्या एकजुटीची खात्री पटेल.''

तेंव्हा सर्जा म्हणाला,''जर त्यांनी आपल्याला चाबकाचे फटके मारून अडवले तर?''

कोंबड्या आणि चीचुंदरी ह्यांनी लगेच त्यावर तोडगा काढला. त्या म्हणाल्या,''आम्ही चाबकाच्या वाद्या कुरतडून कुरतडून तोडून टाकू आणि कोंबड्या ते चाबूक ओढून घेऊन जातील आणि विहिरीत टाकून देतील.''

समशेरने मग ह्याप्रमाणे सर्व प्राण्यांना त्यांची त्यांची कामे समजावून, ठरवून दिली. शेवटी तो म्हणाला,

“आता आपला क्रांतीचा कार्यक्रम ठरला. उद्या रात्री जुन्या मंदिरातील घंटा मी वाजवीन आणि तोच खुणेचा किंवा परवलीचा शब्द समजून प्रत्येकाने ठरल्या प्रमाणे उठाव करायचा आहे. सुजल, सुफल शेताचा आणि काळया आईचा विजय असो.''

तेंव्हा एक खार पुढे आली आणि म्हणाली,”तुम्ही ठरवलेत तर छान. पण तसेच घडते आहे ना हे तुम्हाला – क्रांतीच्या नेत्याला कळणार कसे. आणि त्याप्रमाणे काही बदल करायचा असेल तर तो प्राण्यांपर्यंत पोहोचवणार कोण.”

हे ऐकून सारेच कोड्यात पडले. चिंतेत पडले.

मग त्या खारी पुढे आल्या आणि सगळ्या प्राण्यांना म्हणाल्या,”आमच्यासारखे चपळ कोणीच नाही. आम्ही सगळ्यांना सगळ्यांचे सगळे निरोप पोहोचवण्याचे काम करू.”

अशा रीतीने क्रांतीची योजना ठरली.

**********

जशी योजना ठरली अगदी तशीच ती अमलात आली. एकूण एक नौका आणि बोटी बुडाल्या. नदीचा धक्का आणि आजूबाजूचा सर्व प्रदेश प्राण्यांच्या ताब्यात आला. तसा तो एक महिना त्यांच्या ताब्यात राहिला. त्यानंतर मालकाने माणसांची आणि शस्त्रांची नवीन जादा कुमक मागविली. नव्या दमाच्या माणसांसमोर आणि नळ्या व चाबकाच्या हल्ल्यापुढे प्राण्यांचा टिकाव लागला नाही. ते हरले. सर्जा, समशेर, बिजली, माणिक – सगळ्यांना गोळ्या घातल्या मालकाने. बाकीचे प्राणी सुद्धा मोठ्या प्रमाणावर मारले गेले, जखमी झाले.

त्याच बरोबर मालक सुद्धा हादरला, घाबरला. प्राण्यांचा योजनापूर्वक हल्ला बघून, प्राण्यांचा निर्धार बघून, त्यांचा कडवा विरोध बघून आणि त्यांची एकजूट बघून. प्राण्यांच्या असहकारापुढे मालकाचे काही काम होणे शक्य नव्हते. शिवाय आता लुटण्यासाठी काही उरले नव्हते. शेताची समृद्धी पूर्ण आटली होती, परिस्थिती दिवाळखोरीची होती.

असा विचार करून मालकाने हळू हळू शेताचा ताबा सोडायचे ठरवले. महान आत्मा पांढरा तुरा आणि तरुण, राजबिंडा कोंबडा – ह्यांना बोलावणे धाडण्यात आले.

**********

ह्दिय परिवर्तनाच्या क्रांतीची सुरुवात झाल्यापासून शेतावर सतत, रोज, काही ना काही घडत असे. पण त्या दिवशी जे घडले ते अगदी अनपेक्षित, भयानक घडले.

सकाळची वेळ होती. सगळे आपापल्या कामात बुडलेले. पण कसे कोणास ठाऊक, कत्तलखान्यातून एक गाय निसटली आणि हंबरडा फोडत आपल्या गोठ्याकडे धावू लागली. तिच्या पाठीमागे कसाई आपला सुरा परजत तिला पकडण्यासाठी धावू लागला. कोंबड्यांच्या खुराड्यापाशी पोहोचे पर्यंत कसायाने गाईला गाठले. आणि तो सुऱ्याने गायीवर मिळेल तसे सपासप वार करू लागला.

गाय जीवाच्या आकांताने उठत, पडत, धडपडत धावायचा प्रयत्न करू लागली.

तेव्हढ्यात महान आत्मा पांढरा तुरा, तरुण राजबिंडा कोंबडा आणि इतर कोंबड्या चिंतन बैठक आटपून खुराड्यातून बाहेर पडत होते. त्यांना बघून कसाई सांगू लागला.

‘ही गाय कत्तलखान्यातून पळून जात होती. शेवटी मृत्यूने तिच्यावर झडप घातलीच. पण तीला वेदनारहित मरण यावे असे मला वाटते. तेंव्हा तुम्ही तिचे पाय घट्ट धरलेत तर तिची हालचाल थांबेल. मग माझ्या एका घावातच ती मरेल. दुःखाचा विचार करायच्या आतच तिचे शीर धडापासून वेगळे होईल. मी मग तीला परत ओढत कत्तलखान्यात घेऊन जाऊ शकेन. ’

महान आत्मा पांढरा तुरा ह्यांना त्या गायीची दया आली. तिला मुक्तीची गरज होती. तिचे ते हम्बरणे आणि विव्हळणे चालूच होते. कसाई भला माणूस दिसत होता आणि त्याचे म्हणणे पटणारे होते. गायीच्या भल्याचे होते. तेंव्हा त्या महात्म्याने आणि राजबिंडा कोंबड्याने गायीचे पाय घट्ट पकडून ठेवण्याचे प्रयत्न सुरु केले. सुटण्यासाठी गायीने जोरात शेवटची धडपड सुरु केली. कसाई परत तिच्यावर सपासप वार करू लागला. गायीच्या रक्ताने जमीन भिजून गेली. गाय उठण्यासाठी पाय झाडू लागली. पांढरा तुरा आणि

राजबिंडा कोंबडा गायीचे पाय पकडण्याचे शर्थीने प्रयत्न करू लागले. त्या आक्रोश आणि कोलाहलात गायीची एक जबरदस्त लाथ त्या महात्म्याला बसली. आणि पांढरा तुरा तिथल्या कुंपणावर धाडकन जाऊन आपटला, आदळला, खाली पडला आणि तिथल्या तिथेच गतप्राण झाला.

शेतावर महात्म्याच्या मृत्यूची बातमी वाऱ्यासारखी पसरली. सगळया कोंबड्या जमल्या. सर्व प्राणी आले महात्म्याला शेवटचे बघण्यासाठी. तसे राजबिंडा कोंबड्याच्या आवाजात आपला आवाज मिसळून बाकीच्या कोंबड्या एकमेकांना आणि प्राण्यांना सांगू लागल्या.

"बघितलेत. मृत्यू समोर दिसत असूनही त्या गायीच्या हिंसक हालचाली सुरूच होत्या. तीच आपल्या महात्म्याच्या मृत्यूला जबाबदार आहे."

"गायींना हिंस्त्र पशुचा दर्जा देण्यात यावा."

"गायी मालकापेक्षा क्रूर आहेत, त्यांनी आपल्या प्रिय नेत्याला ठार मारले आहे. त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात यावा."

"आता आपले नेते, तरुण, तडफदार, ह्रिदय परिवर्तनाच्या लढ्यातले अग्रणी, राजबिंडा कोंबडा ह्यांना महात्म्याचे उत्तराधिकारी करावे."

“महान आत्मा अमर रहे, राजबिंडा कोंबड्याचा विजय असो.”

ह्या सर्व सूचना स्वीकारण्यात आल्या.

********

ती जखमी, घायाळ, गाय कशीबशी उठत, लंगडत, घसपटत, शेताच्या कोपऱ्यात आडोशाला गेली. तिच्या जखमांकडे बघायला कोणाला वेळ नव्हता. गोठ्यात अडकून पडलेल्या तिच्या वासरांकडे लक्ष द्यायला कोणाला सुचले नाही. तिचे केविलवाणे कण्हणे आणि विव्हळणे कोणाला ऐकू आले नाही.

फक्त एका गरुडाने सगळे बघितले होते, जाणले होते, अनुभवले होते. त्याने तीला आधार दिला आणि वाचवले. ते सारे आठवून आपले अश्रू लपवत, गरुड म्हणाला,

“आज इथेच थांबू या. पुढची गोष्ट परत कधीतरी.”

********

# पंचा, मफलर आणि सूट

*(ही एक भविष्य पुराणातील भय कथा आहे.)*

---

ही तुमची आमची गोष्ट आहे, एक वाळवंट आणि त्यातील प्रवाशांची. प्रवासी थकलेले होते. तहानेलेले होते. पाण्यासाठी व्याकूळ झाले होते. वाळवंट अस्ताव्यस्त, लांब पसरलेले होते. रुक्ष, रखरखीत, तापलेले. सूर्य डोक्यावर आला होता. मायेचा ओलावा कुठे दिसत नव्हता. तेंव्हा पंचा समोर आला, सावली करतो म्हणाला. पाणी शोधतो म्हणाला. माझ्यामागे या, पाणी मिळेल, आम्ही भुललो. पंचाचे टोक धरून चालत राहिलो. पंचा स्वतःच्या अहंकारिक विश्वात गुरफटला, हरवला आणि त्याच्या पाठीमागे आम्ही सुद्धा वाट चुकलो. चालून पायाला भेगा पडल्या. तेंव्हा एकाच्या लक्षात आले, वाट चुकलो. त्याने लगेच सगळ्यांना सावध केले. पण जमाव इतका पिसाळला कि त्यांनी त्याला च फाशी दिले.

मग कोणीतरी हळूच बोलले, अरे, तो तर आमच्यासारखाच एक प्रवासी होता.

पाणी तर नाही मिळाले, पण तहान आणि भुकेपासून काही जण मुक्त झाले. उरले सुरले विखुरले, पांगले आणि नष्ट झाले. जे चालत राहिले त्यांना वेडे फकीर म्हणून हिणवले.

मग आला मफलर. म्हणाला, सगळे चोर आहेत, दगाबाज आहेत, कोणीही प्रामाणिक नाही, माझ्यावर विश्वास ठेवा, मी तुम्हाला पाणी देतो.

उर फुटेपर्यंत आम्ही वाळू उपसत राहिलो, पण पाणी लागले नाही. तेंव्हा उडालेल्या धुरळयामुळे मफलर खोकून बेजार झाला आणि म्हणाला, आपण तज्ञ व अनुभवी अशा बाहेरच्या लोकांना बोलावू. ते आपली समस्या सोडवतील. सल्लागारांबरोबर विचार विमर्श करून मफलर म्हणाला, आपण हि सगळी वाळू च विकून टाकू म्हणजे आपोआप खाली पाणी लागेल.

पंचाने कान टवकारले आणि पुढे येऊन म्हणाला, वाळू सहित जमीनच विकून टाकू आणि आलेल्या पैशातून पाणी खरेदी करू.

आम्हाला कसेही करून पाणी हवे होतेच. आम्ही मान हलवण्या आधीच विक्रीची बोलणी चालू झाली.

आम्हाला सगळ्यांना एकीकडे एकत्र करून पंचाने जमीन विकायला सुरुवात केली. मफलर ने वाळू विकून मदत केली. त्यांच्या उत्साहापुढे आमचा हीन दिन करुण चेहरा आणखी

बापुडवाणा झाला असावा, तो त्यांना बघवेना, म्हणून आम्हाला थोडे दूरच उभे राहायला सांगितले.

काही वेळाने आम्हाला आणखी दूर जायला सांगितले. असे सारखे होत होत आम्ही शेवटी वाळवंटाच्या कडेला आलो. तेंव्हा काही जण आले आणि म्हणाले, आमच्या जागेवर तुमचे काय काम, जागा खाली करा. आम्ही, नाही हलणार, सांगितले तर बळजबरीने हाकलून दिले.

आम्ही पंचा आणि मफलर ला शोधतो आहे. पण ते कोठेच दिसत नाहीत.

दूरवर एक खूप मोठा पडदा दिसतो आहे आणि पडद्यावर एक खळाळत वाहणारा झरा दिसतो आहे. पंचा आणि मफलर ह्यांची सभा चालू आहे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडीता पाणीही मिळे, ' असे फलक धरून बहुजन उभे आहेत, अदम्य आशेने आणि मोठ्या विश्वासाने.

मग एक सूट आला. म्हणाला, जमीन विकू नका, प्रयत्न अर्ध्यावर सोडू नका. पाणी लागेल. आशेने सगळे सुटाच्या पाठीमागे धावले. त्याने जमिनीची विक्री थांबवली. परत निर्धाराने पाण्याचा शोध सुरु केला.

तेंव्हा पंचा आणि मफलर ह्याने लोकांना सांगायला सुरुवात केली, बघा, पाणी लागले? , नाही. हा सूट बूट वाला आपल्यातला नाही. ह्याला आपली काळजी नाही, त्याचा पोशाखच सांगतो. तो फक्त पाणी शोधायचे नाटक करतो आहे. सुटाने पाण्यासाठी नवीन मार्ग शोधला, म्हणाला, आपण बाजूचे समुद्राचे पाणी आणू व ते शुद्ध करून घेऊ.

एव्हढा मोठा खटाटोप होईपर्यंत लोकांचा धीर सुटत चालला. पंचा आणि मफलर ह्याने मग मोहीम सुरु केली, सूट हाच आपला खरा शत्रू आहे, खोटी आश्वासने आणि भूलथापा देऊन त्यानेच आपले पाणी पळवले. तो खूप श्रीमंत आहे.

पाणी तर मिळत नव्हते, कोण प्रयत्ने करते आहे आणि कोण नाही, जमीन विकावी कि नाही, आणि जर जमीनही गेली आणि पाणीही नाही मिळाले, जसे आधी घडले होते, तर काय करायचे, नुसते प्रश्न आणि प्रश्न.

लोकांचा कौल गोंधळलेला होता. अनागोंदी च्या वातावरणात परत एकदा जमीन विकली गेली.

शेवटी समुद्राचे पाणी शुद्ध करून घेतले. पाणी मिळाले, पण जमीन गेली होती. आम्ही परागंदा झालो, दुसऱ्याच्या मेहेरबानीने, कोणाच्या तरी दयेने, कोठे तरी वळचणीला राहू लागलो.

पंचा आणि मफलर फरार झाले. लोक त्यांना विसरले. लोकांना सुटाची आठवण झाली, पण तो इतिहासात जमा झाला होता.

आम्ही आता जमीन शोधतो आहोत. त्या आधी जमीन शोधाणाऱ्याला शोधतो आहोत.

# शेकोटीपाशी उगाच काहीतरी

*(गंगोत्री - १ ह्या मोहिमेतील base camp मध्ये, शेकोटीपाशी बसून, सूर्यास्ताला, समोरच्या पतन्गिनी धारेकडे बघत असताना, मन भरकटले आणि हात लिहित गेले. जशा शेकोटीतल्या आगीच्या ठिणग्या वाऱ्यावर भरकटत जातात.)*

---

सर्वात शेवटचे वस्तीचे गाव मागे टाकून तुम्ही जी पायवाट धरता ती एकांतातून जाणारी असते. तुमच्या बरोबर तसे तुमचे मित्र – टीम मेम्बर – असतात. पण प्रवास एकट्याचाच असतो. त्या सुंदर एकात्मिक निसर्गातले प्रत्येक झाड, धोंडा, ओढा, पशु-पक्षी आणि आकाश स्वतन्त्र आणि स्वयंभू असतो. प्रत्येकजण स्पर्धा करत असतो एकमेकाशी आणि परत एकमेकांना साहाय्य करत असतो जगण्यासाठी. ते एक 'जन-अरण्य' असते का. त्या जन अरण्यात सगळे समांतर रेशेवरचे सह प्रवासी असतात का.

पाय चालत असतात, मन धावत असते.

तुम्ही अगदी दमून जाता. पोटरीत गोळा येतो. तळपायाला फोड येतात. पण पाय गुलामासारखे मुकाटपणे चालत असतात.

प्रत्येकाची चाल वेगळी. प्रत्येकाचे पाऊलवाटेशी ‘चालणारे’ हितगुज वेगळे. प्रत्येकाची उतार उतरण्याची तऱ्हा वेगळी. खड्डे चुकवण्याची पद्धत वेगळी. बोल्डर पार करण्याची रीत वेगळी. ओझं सांभाळण्याची सवय वेगळी. त्यात परत जर बूट चावत असतील तर प्रत्येकाचा वेदनेचा ठणका वेगळा. पण एखाद्या कवीप्रमाणे वेदनेला कुरवाळत न बसता, तुम्ही पुढे होता. वेदनेवर मुर्दाडपणे पाय रोवत पुढे जावे लागते. तेंव्हा असे वाटते हे पाय आपले नसावेतच. हे दुसऱ्याचे कुणाचे पाय असावेत. पायाबद्दलची ही परकेपणाची भावना वेदनेलाही परके करते. वेदना मात्र अडेलतट्टू प्रमाणे जात नाही. वेदना आणि दुःख ह्यांचात तह होतो. आपण तटस्थ दुःखी होतो. दुःख जे शरीरात पसरते आणि शरीरातच थांबते. ही परकी वेदना जणू दुःखालाही पोरके करते.

तेवढ्यात मित्राची आरोळी ऐकू येते – Halt! – आपण सुटकेचा सुस्कारा सोडतो. मित्राचा आनंदाचा आलेख पाहतो आपण.

हो!! पण मला काय त्याचे. माझे आलेखाचे पानच वेगळे असते. त्या निवांत, नितांत, शांत क्षणी मला ग्रेसच्या ‘चर्चबेल्स’ ऐकू येत असतात. ‘पहाडी धून’ धुक्यासारखी मला वेढून टाकत असते.

खानोलकारांचे ‘शृंगारते शून्य’ विराट, आनंदी रुपात माझ्यापुढे उभे राहते. फार वाटते, माझीही जाणीव – नेणीव त्यात शून्याकार व्हावी. पण ते शून्य मला ग्रासून टाकत नाही आणि दुरही लोटत नाही. मला ह्या शून्यात ‘डूब’* घेण्यापासून कोण परावृत्त करत आहे!! आकाशाला व्यापून अंगुळभर उरणारा ‘पैसाचा खांब’. तो मला त्या शिखरावर सापडेल का!!

**********

चालता चालता वृक्षराजी मागे पडते. झाडे – झुडुपे ही तुरळक दिसू लागतात. तीही मागे टाकून तुम्ही जुनिपरशी सलगी करत मोठ्या मैदानातून संथ चालत राहता. तेंव्हा त्या निर्जन राज्याचे तुम्ही निरिच्छ राजे असता.

पहिल्या मुलाच्या जन्माबरोबर आई बाप जसा अवखळपणा टाकून देतात, नवऱ्याचाही धसमुसळेपणा कमी होतो, तसे काहीसे होते आता. पायांबरोबर मनाचाही वेग मंदावतो. उडी मारून ओहोळ ओलांडण्यापेक्षा पाण्यात पाय आणि पायमोजे भिजवून तुम्ही ओहोळ ओलांडता. तेजस्वी सूर्यप्रकाश तुम्हाला अपार्थिव असे काहीतरी देत असतो. तसा तुमचा निसर्गाबरोबरचा संवाद आधिक गहिरा, मनोमय होत जातो.

************

त्या महाशांत वातावरणात, नक्षत्र ताऱ्यांच्या सहवासात तुम्ही निःशब्दपणे शेकोटीभवती बसलेले असता. One of the 'LISTENERS' -

अज्ञात घोडेस्वारांच्या घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येत आहेत. तुम्ही मनात मोजू लागता. एक. .. . दोन. .. तीन. .. . चार. .. .. .. .. .. .. .

घोडेस्वार आता अगदी जवळ आला असेल, पोहोचला, दाराशी आला, ठक – ठक – ठक, दार ठोठावत आहे, जोरात दार ठोठावतो आहे, त्याने माझ्यासाठी निरोप आणला असेल, मला दार उघडायला हवे, पण दार उघडण्याची शक्ती नाही माझ्यात, भीती वाटते आहे, कशाची तरी, कोणाची तरी, तो घोडेस्वार नक्की कोण असेल - यमदूत, देवदूत, कि मनुष्य – मित्र कि शत्रू? कि माझे भूत का भविष्य? अनामिक पाहुणा? . .. .. .. दार किती दूर आहे. एकदाच शेवटचे दार ठोठावले त्याने. जीवघेणी शांतता. काही घडत नाही आहे.

घोडेस्वार कंटाळून परत निघाला वाटते, घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येत आहेत. तुम्ही मनात मोजू लागता. एक. .. . दोन. .. तीन. .. . चार. .. .. .. .. .. .. . .

************

हिमालयातल्या धुवांधार पावसानंतर निरभ्रं, मोकळ्या आकाशाखाली मातीचा गंध मनाला अगदी कातर, कावरे – बावरे, करतो. सुर्यालाही जणू कारुण्य बिंब करतो.

आठवते, Charle Chaplin चे पहिले प्रेम, पहिला प्रेमभंग, ते दुःखाचे काहूर, ती जीवाची तगमग, शेवटची धडपड, तो ह्रिदय हेलावून टाकणारा स्वर, तो मृत्यू!! किती किती जणांचे मृत्यू, टाहो फोडणारे, प्रश्न विचारणारे, परमात्म्यालाही अगतिक, अनुत्तरीत करणारे मृत्यू.

*************

पतन्गिनी धार. हिमवर्षाव, हिमनदी, हिमप्रपात. जणू वादळी आवर्तनांमध्ये भरून राहिलेला शून्य वेग. किंवा दगडामध्ये गोठलेले वादळ. शून्य आणि अनंत ह्या दोन टोकांमध्ये जे जे आहे, ते ते सगळेच सापेक्ष, संदर्भाप्रमाणे बदलणारे, काटलेल्या पतंगाप्रमाणे भरकटणारे.

सत्य हे आहे, नवीन उंची गाठली कि भुकेचे फूल मलूल होते आहे. स्वभाव, सहनशक्ती, जिद्द, stamina – सर्व व्यक्तिमत्वाच्या मर्यादा पाहण्याची, तपासण्याची, अनुभवण्याची आणि ओलांडण्याची वेळ आली आहे.

************

गूढ, भारलेल्या आणि भारावलेल्या उत्तर रात्री. सिद्धार्थ तीरावर उभा. नावाडी नदीच्या पात्रात दिसेनासा होत आहे. मनात शांत, एकांतात आयुष्याचे अगणित अर्थ उमलत आहेत. चौकट ओलांडण्याची वेळ आली आहे. नदीच्या लाटा पायाशी खळबळ करत आहेत. प्रत्येक लाटेवरून एकेक आठवण तरंगत पुढे येत आहे. आणि फुटून, विरून जात आहे. अनिवार्य कारुण्य आणि खेद मनात दाटून येत आहे. विचलित करू पाहणाऱ्या विसंगतींचे गाठोडे नावाड्याबरोबर परत पाठवून दिले आहे. सिद्धार्थ जवळ आता काही नाही.

मार्गस्थ आहे,

पण

अजून बुद्ध नाही.

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव


www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com